
धगधगते यज्ञकुंड
वि.दा.सावरकर

# हृदयसंवाद!

सस्नेह,

आपण अनेकदा भेटतो; अनेक कारणासंाठी. आपलं मैत्र जुनं आहे. व्यास क्रिएशन्स्चे विविधांगी उपक्रम आपल्याचसाठी असतात. हा एक सत्शील परिवार आहे. परिवाराची विचारधारा ही परिवाराचा केंद्रबिंदू असते. सावरकर प्रेमाने तर आपण कित्येक दशकं भारावलो गेलो आहोत. म्हणून 'अनादि अनंत सावरकर' ही ग्रंथनिर्मिती महाराष्ट्रात कौतुकास पात्र ठरते. आपल्याला हिंदुत्व आणि प्रखर राष्ट्रवाद ही ज्योत कायम तेवत ठेवायची आहे. या ज्योतीच्या प्रकाशाने आपलं आयुष्य कैक पिढ्या उजळून जाणार आहे. तुम्ही आणि आम्ही मिळून सावरकरांचं व्यक्तिमत्त्व घराघरांत- शाळा-शाळांत पोहोचवण्याकामी विचारांच्या प्रांगणात उतरलो तर... या 'तर'नेच 'धगधगते यज्ञकुंड : वि. दा. सावरकर' या ग्रंथाची संकल्पना अंतस्थ जागवली आणि श्री. वा. नेर्लेकर यांनी त्याकरिता लेखक म्हणून अपार कष्ट घेतले. हे पुस्तक 'व्यास क्रिएशन्स्'साठी 'विजयीयात्रा' आहे. असं म्हणा हवं तर- 'सावरकर विषय आणि आशय' सुदृढ मनात घट्ट रूजावा याकरिताच ही लोकचळवळ आहे आणि म्हणूनच आपल्याला साद घालतोय की, 'धगधगते यज्ञकुंड' या पुस्तकाच्या एक लाख प्रती महाराष्ट्रात, गावागावात-शहरांत पोहोचाव्यात याकामी आपलाही प्रतिसाद आवश्यक आहे. व्यासच्या इतिहासातलं हे 'सुवर्ण पान' आहे.

अर्थात हा इतिहास आपण वाचक म्हणून, हितचिंतक, आप्तेष्ट-मित्र म्हणून त्याला आगळं महत्त्व आहे. आता फक्त एकच करायचं - सावरकरमय होऊन जगायचं आणि धगधगते यज्ञकुंड सर्वदूर पोहोचवायचं. हे कार्य नव्हे; ही सेवा-सद्भाव आहे. तो आपण मिळून करूयात... यशाचं शिखर गाठताना वर्तमानाचा कायापालट होऊन एक 'पिढी' सुजाण आणि भरभक्कम होईल, हा आशावाद आपल्यातला समान दुवा आहे!

**धन्यवाद!**

आपला
**नीलेश गायकवाड**
(संचालक - व्यास क्रिएशन्स्)

ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान
साहित्य प्रतिष्ठान

# धगधगते यज्ञकुंड

वि. दा. सावरकर

श्रीकांत वा. नेर्लेकर

व्यास क्रिएशन्स्

साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

# धगधगते यज्ञकुंड : वि. दा. सावरकर

लेखक : **श्रीकांत वा. नेर्लेकर**

मार्गदर्शक : **मधुकरराव कुलकर्णी, शंकरराव गोखले**

प्रकाशक : **नीलेश गायकवाड**
**व्यास क्रिएशन्स**, डी-४, सामंत ब्लॉक्स,
श्रीघंटाळीदेवी मंदिर पथ, नौपाडा, ठाणे (प.) - ४०० ६०२.
दू. क्र. २५४४ ७०३८

मुखपृष्ठ : **अच्युत पालव**

रेखाचित्रे : **सुधीर खेडेकर**

सजावट-मांडणी : **सुधीर मुणगेकर**

अक्षरजुळणी : **मनिषा गोळे**

विशेष सहकार्य : **विनोद पितळे, राजेश दाभोळकर, रवींद्र हनमट्टीकर,**
**मनोज चव्हाण, पल्लवी इंगळे, प्रशांत रुमाले,**
**अक्षता मुजुमदार, चिरंतना फाटक, किशोर मोरे, योगेश.**

मुद्रक : **जी. पी. ग्राफिक्स**, ठाणे


पहिली आवृत्ती : **१४ एप्रिल २००९**

दुसरी आवृत्ती : **१२ जानेवारी २०१०**

तिसरी आवृत्ती : **२८ मे २०११**

मूल्य : **रु. ४०/-**

ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान



## अर्पण पत्रिका

स्वातंत्र्यसमरातील
आयुष्य समर्पित
करणाऱ्या ज्ञात-अज्ञात
स्वातंत्र्ययोद्ध्यांना मानवंदना !

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| १ | **मानवंदना** | : विक्रम ना. सावरकर | ५ |
| २ | देशभक्तीची ऊर्जा निर्माण करणारे **धगधगते यज्ञकुंड** | : शंकर द. गोखले | ८ |
| ३ | **थोडेसे मनातले...** | : श्री. वा. नेर्लेकर | १५ |
| ४ | **आमरण प्रतिज्ञा पालन** | | १९ |
| ५ | **देशसेवेची बाळगुटी** | | २१ |
| ६ | **मुंगी उडाली आकाशी** | | २३ |
| ७ | **स्वातंत्र्याचा पुजारी** | | २५ |
| ८ | **शत्रूच्या गुहेत सिंहाचा छावा** | | २७ |
| ९ | **जयोस्तुऽते श्रीमहन्मंगले... (कविता)** | | ३२ |
| १० | **त्रिखंडात गाजलेली समुद्रउडी** | | ३३ |
| ११ | **काळ्या पाण्यात दडलेली भविष्यवाणी** | | ३५ |
| १२ | **अंदमान नव्हे; तीर्थक्षेत्र** | | ३७ |
| १३ | **अस्पृश्यांचा कडवा कैवारी** | | ४१ |
| १४ | **चपखल मराठी शब्दांचे जनक सावरकर** | | ४३ |
| १५ | **सावरकरांची साहित्यसृष्टी** | | ४५ |
| १६ | **सावरकरप्रणीत 'हिंदुराष्ट्र' संकल्पना** | | ४७ |
| १७ | **निदिध्यास 'अखंड भारता'चा** | | ४९ |
| १८ | **इथे ओशाळला मृत्यू** | | ५१ |
| १९ | **परंतु या सम हाच!** | | ५३ |
| २० | **समस्त सावरकर देशकारणी विलीन** | | ५५ |
| २१ | **स्वातंत्र्यवीर सावरकरांचा जीवनपट** | | ५६ |
| २२ | **ने मजसी ने परत मातृभूमीला... (कविता)** | | ५९ |
| २३ | **हृदयसंवाद!** | | ६० |


ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान

## मानवंदना

# अखंड हिंदुस्थानाची प्रेरणा देणारे चरित्र

सर्वप्रथम विद्यार्थ्यांसाठी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे आदर्श चरित्र लिहिण्यासाठी लेखक श्री. श्री. वा. नेर्लेकर यांचे अभिनंदन करतो. साधारणपणे कुमारवयातच देशाच्या भावी पिढीचे ध्येय-धोरण योजिले जाते. त्यांच्यासमोर देशभक्तीचा मूर्तिमंत आदर्शच असलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या चारित्र्याचा स्वत्वांश योग्य पद्धतीने सादर करण्याचे महान कार्य या पुस्तकाद्वारे करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, सध्या आपल्या देशात धुमाकूळ घालणारे पाकिस्तानी हस्तकांचे सर्वांगीण आक्रमण चालू असताना या पुस्तकाचे प्रकाशन होणे, म्हणजे त्यावरील 'रामबाण' उपाययोजनाच ठरते.

### धर्माच्या आधारावर विभाजन

दि. १५ ऑगस्ट १९४७ला 'हिंदुस्थान' ब्रिटिशांच्या राजवटीतून मुक्त झाला. परंतु त्यावेळी आपला देश धर्माच्या आधारावर दोन राष्ट्रांत विभागला गेला. १९४५-४६ मध्ये ब्रिटिशांकित भारतात 'मध्यन्तर शासन' स्थापण्यासाठी निवडणूक घेण्यात आली. त्यात देशातील नव्याण्णव प्रतिशत मुसलमानांनी, वेगळ्या पाकिस्तानची मागणी करणाऱ्या मुस्लिम लीगला मतदान केले. त्यामुळेच पाकिस्तान नावाच्या वेगळ्या मुस्लिम राष्ट्राची निर्मिती झाली. अपेक्षित असे होते की, पाकिस्तानची मागणी करणाऱ्या सर्व मुसलमानांनी पाकिस्तानात जावे. म्हणजे उर्वरित हिंदुस्थान हा केवळ 'हिंदुराष्ट्र' म्हणूनच स्वतंत्र देश राहील.

देशाच्या फाळणीला विरोध करणाऱ्या हिंदू महासभेचे नेते स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीही, पाकिस्तान निर्मितीनंतर लोकसंख्येची अदलाबदल करण्याची मागणी केली होती. म्हणजे पाकिस्तानात राहणाऱ्या हिंदूंनी भारतात, म्हणजे हिंदुराष्ट्रात यावयाचे आणि पाकिस्तानची मागणी करणाऱ्या भारतातील सर्व मुसलमानांना पाकिस्तानात पाठवायचे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हीच मागणी केली होती. त्यामुळे विभाजनाच्या वेळी झालेले हिंदूंचे शिरकाण (कत्तल) टळले असते!

परंतु दुर्दैवाने तसे घडले नाही. पाकिस्तानात असलेल्या हिंदू समाजाची मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्तहानी झाली. लक्षावधी निर्वासितांचे लोंढे आपल्या हिंदुराष्ट्रात- भारतात आले...

... पण पाकिस्तानची मागणी करणारे भारतातील मुसलमान मोठ्या संख्येत (अडीच कोटी) भारतातच राहिले! त्यांची चक्रवाढ पद्धतीने आज सुमारे वीस कोटी लोकसंख्या झाली आहे. खंडित स्वतंत्र भारताच्या शासनाने घटनेत दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार 'समान सामाजिक संहिता' लागू न करण्याचा हा परिणाम! यातील पाकिस्तानी प्रवृत्तीचे लोकच आज भारतात भयानक घातपाताची कृत्ये करीत आहेत.

... हे सत्य नव्या उमलत्या पिढीला कळलेच पाहिजे.

... स्वातंत्र्यवीर सावरकरांनी देशाच्या विभाजनाला केलेला विरोध निष्फळ ठरला. तरीही स्वातंत्र्यवीर सावरकरांनी, 'ज्याप्रमाणे आपण भारतातून ब्रिटिशांचे राज्य घालविले त्याप्रमाणेच सध्याच्या पाकिस्तानात असलेली परकीय औरंगजेबी राजवट उखडून तेथेही हिंदुराज्य स्थापन केले पाहिजे; म्हणजे अखंड हिंदुस्थान स्वतंत्र केल्याचे ध्येय साध्य होईल,' असा प्रचार जीवनाच्या अंतापर्यंत सातत्याने केला.

वर्ष १९६५ मध्ये पाकिस्तानने भारतावर केलेल्या आक्रमक युद्धात भारत विजयी झाला. लाहोरच्या तटावर भारताचा राष्ट्रध्वज हिंदुस्थानी सेनेने फडकविला! त्याचवेळी रुग्णावस्थेत असलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनी, 'तसेच पुढे जाऊन संपूर्ण पाकिस्तान जिंका,' असा संदेश दिला. दुर्भाग्याने तसे घडले नाही! आणि म्हणूनच त्यावेळी उरलेला पाकिस्तान आज भारतात घातपाती कृत्ये सातत्याने घडवून आणत आहे!!

... उमलत्या देशभक्त युवा पिढीला हे सत्य समजले तरच स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिप्रेत असलेला 'अखंड सर्वांगीण, बलसंपन्न हिंदुस्थान' निर्माण करण्याची यशदायी प्रेरणा मिळेल!

पुन्हा एकदा लेखक श्री. श्री. वा. नेर्लेकर यांचे अभिनंदन करतो.

**- विक्रम नारायण सावरकर**

कमलकुंज, शिवसेना भवन पथ,

दादर, मुंबई -४०० ०२८



ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान

साहित्य प्रतिष्ठान

## देशभक्तीची ऊर्जा निर्माण करणारे

# ‘धगधगते यज्ञकुंड’

**स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर** हे जहाल सशस्त्र क्रांतिकारक, प्रखर देशभक्त, समाजसुधारक, महाकवी, लेखक, साहित्यिक असे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असणारे, डोळे दिपवणारे तेजस्वी रत्न होते. त्यांनी आपल्या संपूर्ण जीवनात विविध प्रकारे सातत्याने राष्ट्रसेवा केली.

**व्यास क्रिएशन्स्**ने स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १२५व्या जयंतीनिमित्त ‘**अनादि अनंत सावरकर**’ गौरवग्रंथ साकारला. या ग्रंथाच्या प्रकाशनाने अख्खा महाराष्ट्र ढवळून निघाला. ‘**अनादि अनंत सावरकर**’ गौरवग्रंथाच्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर **व्यास क्रिएशन्स्**ने आपले लक्ष विद्यार्थीवर्गाकडे वळवून सावरकरांचे राष्ट्रोद्धारक विचार, तत्त्वज्ञान आणि कार्य विद्यार्थी व युवकांसाठी छोटेखानी ‘**धगधगते यज्ञकुंड : वि. दा. सावरकर**’ हे पुस्तक सादर केले आहे. हे पुस्तक उपलब्ध माध्यमांतून पोहोचवता आले तर देशात सामाजिक, राजकीय क्रांती व परिवर्तन होऊ शकेल.

आजचे शैक्षणिक क्षेत्रातील भयावह परिस्थितीचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. आपला समाज नीती, नियम, संस्कार, परंपरा, आपले आदर्श यांच्यापासून वंचित झाला आहे. सावरकरांनी आपल्या संपूर्ण जीवनात विविध प्रकारे सातत्याने राष्ट्रसेवा केली. राष्ट्राचाच सतत विचार करून समाजाला मार्गदर्शन केले. स्वातंत्र्यसंग्रामातील एक प्रखर तेजस्वी व धगधगती ज्वाला म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर. या ज्वालेने अनेक क्रांतिकारकांना तेज व ऊर्जा दिली, प्रेरणा पुरवली. हा एक ईश्वरीय चमत्कार म्हणावा लागेल. हिंदुत्व, विज्ञान, स्वातंत्र्य आणि राष्ट्रहित या निष्ठांसाठी त्यांनी आपली लेखणी झिजवली. राष्ट्र उभारणीसाठी समर्थ, प्रबळ विज्ञाननिष्ठ अखंड हिंदू राष्ट्राचा ध्यास घेऊन त्यासाठी आयुष्यभर अखंड प्रयत्न केले आणि शेवटी देशाच्या यज्ञकुंडात आहुती दिली.

**व्यास क्रिएशन्स्** प्रकाशित ‘**धगधगते यज्ञकुंड : वि. दा. सावरकर**’ हे पुस्तक प्रत्येकाने वाचायला हवे. कारण ते प्रेरक आहे, स्फूर्तिदायक आहे, आदर्शवत आहे. जे उद्याचा भारत घडवणार आहे. हे पुस्तक आपल्याला जीवनाच्या इच्छापूर्तीकडे नेईल, असा ठाम विश्वास वाटतो. हे नुसते पुस्तकच नाही, तर हा दस्तऐवज आपल्या घरातील मुलांचे ‘भवितव्य’ आहे. मुलांचे संस्कारक्षम मन शाळा-शाळांतून घडले जाते. हे पुस्तक जणू त्याचीच ‘संस्कारवेल’आहे!

**- शंकर द. गोखले**

अध्यक्ष, स्वा. सावरकर साहित्य अभ्यास मंडळ, मुंबई



साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com



# थोडेसे मनातले...

विनायक दामोदर सावरकर म्हणजे देशाच्या स्वातंत्र्याच्या इतिहासातील एक सोनेरी नाव. चकाकणारे ते सर्व सोने असतेच असे नाही, पण सावरकर म्हणजे अस्सल शंभर नंबरी सोने होय. त्यांचे चरित्र म्हणजे स्वातंत्र्यसमराची महन्मंगल गाथा. ‘स्वतंत्र भारत’ हा त्यांचा श्वास होता. त्यांचे ८३ वर्षांचे आयुष्य म्हणजे या श्वासाचाच एक धगधगता इतिहास आहे.

आपल्या आयुष्याचा क्षण न् क्षण त्यांनी त्यासाठी वेचला. त्यांचे बोलणे, चालणे, वागणे आणि लिहिणे केवळ त्यासाठीच होते. प्रत्येक कृती त्यासाठीच केली. इंग्रजांच्या गुलामगिरीच्या जोखडातून देश मुक्त करणे, म्हणजे स्वातंत्र्य; एवढाच त्यांचा स्वातंत्र्याचा मर्यादित व संकुचित अर्थ नव्हता. आपला देश सर्व क्षेत्रांत इतका सामर्थ्यशाली व बलसंपन्न व्हावा; की त्याच्याकडे कुणीही वाकड्या नजरेने पाहण्यास धजावणार नाही, ही त्यांच्या स्वातंत्र्याची व्याख्या होती. देश अखंड, एकसंध आणि बलशाली होण्यासाठी आयुष्यभर त्यांनी संघर्ष केला. स्वातंत्र्यलढा अनेक जण लढले आणि त्यामुळेच देश स्वतंत्र झाला. पण सावरकर अक्षरशः स्वातंत्र्यसमर जगले.



ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान

इतक्या निष्ठेने आणि उत्कटतेने देशासाठी स्वातंत्र्यसमर जगणारा दुसरा महापुरुष इतिहासात चुकूनसुद्धा आढळत नाही. त्यामुळेच विनायक दामोदर सावरकर हे नुसते नाव नाही; तर स्वातंत्र्याची प्रेरणा देणारा - तो तेरा अक्षरी चिरंजीवी मंत्र आहे. एकवेळ जगाचा अंत होईल, पण या मंत्राचा प्रभाव आणि सामर्थ्य कदापिही नष्ट होणार नाही. जुन्या पिढीला हा मंत्र माहीत आहे. सावरकर अनेकांना परिचित आहेत. पण खऱ्या अर्थाने सावरकर कळले किती जणांना याबद्दल मात्र शंका आहे. आजचे आठवी ते पंधरावी इयत्तेपर्यंत शिकणारे विद्यार्थी म्हणजे बाल आणि तरुणाई यांचे खरे प्रतिनिधी होत. त्यांना सावरकर कितपत माहिती आहेत ?

वयाच्या सातव्या-आठव्या वर्षांपासून ते वयाच्या ८३व्या वर्षांपर्यंत सावरकरांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेले कार्य इतके अफाट व स्फूर्तिदायक आहे, की त्याची तुलना केवळ छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशीच होऊ शकते. जहाल क्रांतिकारक, समाजसुधारक, लेखक, महाकवी, नाटककार, हिंदू संघटक, पत्रकार, प्रभावी वक्ता अशा कितीतरी भूमिकांमधून त्यांच्या जीवनाचे दर्शन आपल्याला घडते. आजच्या विद्यार्थ्यांना म्हणजेच भारताची तारणहार असलेल्या उमलत्या पिढीला त्यांच्या जीवनाचे दर्शन घडवण्याचा हा प्रयत्न आहे. मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर तर सावरकरांचे जीवन व त्यांचे कार्य म्हणजे बाल-तरुणांसाठी प्रेरणास्त्रोत आहे.

ज्या वयात मुले मनसोक्त खेळतात, बागडतात, भरपूर दंगामस्ती करतात, त्या वयातच त्यांच्यासमोर सावरकरांच्या जीवनातले काही ठळक पैलू ठेवावेत, यादृष्टीने केलेला हा प्रयत्न सर्वांना आवडेल अशी अपेक्षा आहे. चरित्र म्हटले की जन्मापासून अंतापर्यंत घडलेल्या घटनांचे चित्रण सलगपणे करण्याची सर्वसाधारण पद्धत आपल्याकडे रूढ आहे. पण या पुस्तकात सावरकरांच्या आयुष्यातील ठळक घटना घेऊन त्या फुलवत त्यातून त्यांचे चरित्र सांगण्याचा वेगळा प्रयत्न केला आहे. त्यातून स्वातंत्र्यवीर सावरकर शंभर नंबरी सोने कसे आहेत, हे विद्यार्थ्यांना समजेल अशी अपेक्षा आहे.

**- श्री. वा. नेर्लेकर**

★★★



साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

# काही ध्येयवादासाठी...

प्रकाशन संस्थेत **'व्यास क्रिएशन्स्'** हे नाव आता बहुचर्चित झालं आहे. प्रत्येक वेळी नवा शोध-नवा बोध अन् नव्या जाणिवा घेऊनच आम्ही वाचकांसमोर जातो. अर्थात इथल्या माणसाची; इथल्या मातीशी असलेली घट्ट वीण सुखावणारी आहे. म्हणूनच आमचे कोणतेही उपक्रम, संकल्प हे आमच्यापुरते राहत नाहीत. त्याचा लोकानुनय झपाट्याने होतो.

पत्रकार श्री. वा. नेर्लेकर लिखित **'धगधगते यज्ञकुंड : वि. दा. सावरकर'** हे पुस्तक या आमच्या प्रवासातलं सगळ्यात महत्त्वाचं अन् महत्त्वाकांक्षी पुस्तक होय. अर्थात 'गुरुजी' या नावानं परिचित असलेले श्री. वा. नेर्लेकर यांचं पत्रकारितेतलं योगदान बहुश्रुत आहे. त्यांची धावपळ आणि त्यांचा माणसांत मिसळण्याचा उत्साह, कमालीची शिस्त आणि पराकोटीचा प्रामाणिकपणा- असे विविध पैलू असलेला हा कलंदर माझ्या आयुष्यात 'गुरुतुल्य' आहे. सावरकर यांचं चरित्र सर्वज्ञात आहेच, पण तरीही सावरकरांचा जीवनविशेष नव्यानं, नव्या शैलीत लोकांसमोर यावा, ही दुर्दम्य इच्छाशक्ती सावरकर जयंती वर्षाच्या (२८ मे २००८) निमित्ताने प्रबळ झाली. त्यास सावरकरनिष्ठ संस्थांनी, सावरकरप्रेमींनी 'हिंदुत्वा'ची कास धरत या 'सावरकर-विचारयात्रेत' हिरिरीने भाग घेतला. मनोबल उंचावलं. सकारात्मक दृष्टिकोन ठेवून सतत कार्यरत राहिल्यास, यशाचं शिखर सहज गाठता येतं. 'व्यास क्रिएशन्स्' याच ध्येयवाटेवरून चालत आली आहे.

सावरकरांनी जातीभेद मानला नाही. समाजसुधारक म्हणून केलेलं कार्य अलौकिक आहे. स्वातंत्र्यासाठी-स्वातंत्र्यापूर्वी ज्यांनी-ज्यांनी देशाला स्वतःप्रति समर्पित केलं, त्यात आदराचं स्थान विनायक दामोदर सावरकर यांचं होतं. भाषाशुद्धीची चळवळ, जनजागृती, ब्रिटिश साम्राज्याला कडवा विरोध, हिंदू संघटन असे अचाट कार्य करणारे सावरकर बालपणातही तेवढेच बुद्धिवादी होते. कुस्ती, नदीवर पोहायला जाणे, वाळवंटात खेळणे, आपसात दोन गट पाडून लढाईचा खेळ खेळणे, जोर-बैठका काढणे यातही विनायक सावरकर आघाडीवर होता.



ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान

ज्या वयात नुसता अभ्यास एके अभ्यास पालकांना अभिप्रेत असतो, त्याच वयात मोठ्यांना अचंबा वाटेल अशी कामगिरी विनायकने लहानपणी केली. कथा, कविता, इतिहास, निबंध आदी वेगळ्या विषयांवरची पुस्तके विनायकने शालेय वयात वाचली. एवढेच नव्हे तर, निबंध स्पर्धेत पहिला क्रमांक पटकावल्यावर अध्यक्षांनी त्याच्याबद्दल केलेलं वक्तव्य त्याने ज्या हुशारीने खोडून काढलं, त्यामुळे उपस्थितांची त्रेधा उडाली. अनेक वर्तमानपत्रं, मासिकं यात विपुल लेखन केलं. साहित्यातली त्यांची मुशाफिरी कौतुकास्पद होती.

या सगळ्या पार्श्वभूमीवर 'धगधगते यज्ञकुंड : वि. दा सावरकर' हे पुस्तक वैशिष्ट्यपूर्ण आहे. गुरुजींनी अथक परिश्रम करून त्यांचं जीवन रेखाटलंय, ते आजच्या शाळा-महाविद्यालयांतील प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी आदर्शवत् असंच आहे. आपण इतिहास विसरत चाललो आहोत, इतिहास ज्यांनी घडवला, त्यांचं आयुष्य आपण आज प्रेरणा मानून मार्गक्रमण केलं पाहिजे. या पुस्तकाच्या माध्यमातून 'प्रखर राष्ट्रवाद' जोपासला जावा, अशी आंतरिक इच्छा आहे.

तात्यारावांवरील हे पुस्तक आजच्या पिढीला, ज्या पिढीकडे देश 'उद्याचे भावी नागरिक' म्हणून पाहतोय, त्या प्रत्येकासाठी स्फुल्लिंग चेतवणारं आहे. मला स्वतःला या निर्मितीमुळे खूप आनंद होत आहे. आपल्या सगळ्यांचा 'आशीर्वाद' आहेच, त्यामुळेच हे धाडस! आपल्याच माणसांसाठी!!

**- नीलेश गायकवाड**

★★★


साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com



# आमरण प्रतिज्ञा पालन

नाशिक जिल्ह्यातील भगूर या छोट्याशा गावी सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ रोजी झाला. वयाच्या ९व्या वर्षी आई राधाबाई, तर वयाच्या १६व्या वर्षी वडील दामोदरपंत यांचे छत्र हरपले. आई-वडिलांच्या प्रेमाला पारखे झालेल्या विनायकाचा सांभाळ त्यांचे थोरले बंधू गणेश ऊर्फ 'बाबा' यांनी केला. बालविनायक त्या वेळी आपल्या घरी व मित्रमंडळीत 'तात्या' या टोपणनावाने ओळखले जात. बालविनायकाने देशाच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीची घेतलेली थोर प्रतिज्ञा म्हणजे त्याच्या पुढील आयुष्यासाठी कलाटणी देणारी घटना असून तिचं महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्या वेळी त्याचे वय होते अवघे १४ वर्षे! आपल्या घरातील कुलदेवता अष्टभूजा देवीच्या चरणापाशी बसून 'यापुढे मी माझ्या देशाचे स्वातंत्र्य परत मिळवण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून 'मारिता मारिता मरेतो झुंजेन' अशी प्रतिज्ञा त्याने घेतली. स्वातंत्र्यसमरात टाकलेले 'पहिले पाऊल' असे त्याचे वर्णन करावे लागेल.


साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

भारतात त्या वेळी इंग्रजांचे राज्य होते. अन्याय, दडपशाही, जुलूम-जबरदस्ती यांचे तांडव सुरू असल्याने वातावरण चांगलेच तापलेले होते. इंग्रजांविरुद्धचा असंतोष उफाळून आला होता. महाराष्ट्रात १८९७च्या सुमारास प्लेगची जोरदार साथ सुरू होती. ही साथ आटोक्यात आणण्यासाठी सरकारने लोकांना सक्तीने आपली राहती घरे सोडण्यास भाग पाडले. हा उपाय लोकांना रोगापेक्षा भयंकर वाटला. सक्ती, जुलूम व अत्याचार चालू असतानाच इंग्रज सरकारने महाराणी व्हिक्टोरिया राणीचा राज्यारोहण समारंभ भारतात मोठ्या थाटामाटाने साजरा करण्याचा निर्णय घेतला.

प्लेगने पीडित व अत्याचाराने संतप्त असलेल्या लोकांना हा निर्णय अपमानास्पद, मानहानीकारक व जखमांवर मीठ चोळण्याचा प्रकार वाटला. चाफेकर बंधूंनी दोन इंग्रज अधिकाऱ्यांना बंदुकीने यमसदनाला पाठवून या कृत्याचा सूड घेतला. उभा देश या घटनेने हादरला! खदखदणाऱ्या असंतोषाच्या उद्रेकाची एक चुणूक त्यातून लोकांना दिसली. इंग्रजांच्या हातात तर अमर्याद सत्ता होती. त्यांनी चाफेकर बंधूंना फाशीची शिक्षा ठोठावून फासावर चढवले. इंग्रजांचे अमानुष अत्याचार आणि चाफेकर बंधूंचे अतुलनीय शौर्य व हौतात्म्य या घटनांचे तीव्र पडसाद बालविनायकाच्या मनात उमटले नसते तरच नवल! त्याचे शौर्य व साहस यांच्यावर उत्स्फूर्त कविता रचून त्याने आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. पण केवळ काव्य करून विनायक थांबला नाही. तर त्याने सशस्त्र क्रांतीची घेतलेली प्रतिज्ञा हा त्याच्या आयुष्याला वेगळे वळण देणारी घटना ठरली. या घटनेची तुलना केवळ छत्रपती शिवाजी महाराजांनी कुलदेवता भवानी मातेच्या साक्षीने घेतलेल्या स्वातंत्र्याच्या प्रतिज्ञेशीच होऊ शकेल.

प्रतिज्ञा घेणे सोपे आहे, पण त्यानुसार वागून ती प्रतिज्ञा आचरणात आणणे महाकर्मकठीण. प्रतिज्ञा मोडण्यासाठी नव्हे तर ती प्रत्यक्ष आचरणात आणण्यासाठी असते हे दाखवून देणारा एकोणिसाव्या-विसाव्या शतकातील पहिला विद्यार्थी म्हणून सावरकरांचे नाव इतिहासात अजरामर झाले असे म्हणावे लागेल. १४ वर्षे वयाच्या मुलाने आयुष्यभर प्रतिज्ञेचे पालन करून तिचा अर्थ शब्दशः खरा करून दाखवला. जगाच्या इतिहासात असे दुसरे उदाहरण आढळत नाही. प्रतिज्ञेचे पालन करून त्यासाठी लढणारे दोनच वीरपुरुष जगाला ठाऊक आहेत. पहिले शिवछत्रपती. तर दुसरे सावरकर. 'स्वातंत्र्यवीर' ही बिरुदावली त्यांच्यामागे अभेद्यपणे आपोआप लागते ती त्यामुळेच.

★★★


ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान



# देशसेवेची बाळगुटी

विनायकाने देशाच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीची प्रतिज्ञा वयाच्या १४व्या वर्षी घेतली खरी, पण त्याचे मूळ आई-वडिलांच्या आदर्शात व त्यांच्याकडून कळत-नकळत होणाऱ्या संस्कारामध्ये दडलेले होते हे दिसून येईल. विनायकाचे बालमन त्यातून घडत होते. वडील दामोदरपंतांना इंग्रजी, मराठी काव्याची आवड होती. ते स्वतः कविताही करीत असत. रात्री जेवणानंतर आपल्या मुलांना रामायण, महाभारतातील कथा, रामविजय, हरिविजय, वामन पंडित, होमर यांची काव्ये वाचून दाखवीत असत. शिवाजी, राणाप्रताप आणि पेशव्यांच्या बखरी व पराक्रमाचे पोवाडे यांची माहिती देत असत.

घरात धर्मग्रंथांचे पठण व वाचन नेहमी सुरू असे. विनायकाची कुशाग्र बुद्धी आणि संस्कारी मन हे सर्व आत्मसात करू लागले. विविध स्तोत्रे, ऋचा, पोवाडे, कविता त्याने शब्दव्रत केल्या. इतिहास नि महाकाव्ये यांच्यापासून त्याला विशेष स्फूर्ती मिळत असे. घरातील विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेचे व टिळकांच्या केसरीचे जुने अंक वाचण्याची त्याला गोडी लागली. गावात येणारी वर्तमानपत्रे तो वाचू लागला व इतरांना वाचून दाखवू लागला.



साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

पुस्तके व वृत्तपत्रे वाचण्याचे त्याला इतके वेड लागले होते, की ते तो अथपासून इतिपर्यंत संपूर्ण वाचून काढीत असे. त्याची बुद्धी अलौकिक व प्रतिभा अवर्णनीय होती, तर त्याची तन्मयता व एकाग्रता लोकविलक्षण होती. लहानपणीच त्याला कविता करण्याचा छंद लागला.

पुण्यातील नामांकित वृत्तपत्रातून विनायकच्या कविता प्रसिद्ध होऊ लागल्या. त्या वेळी त्याचे वय जेमतेम दहा वर्षांचे होते. 'श्रीमंत सवाई माधवरावांचा रंग' हा फटका (उपदेशपर काव्यप्रकार) विनायकाने वयाच्या ११व्या वर्षी रचला. वयाच्या १५व्या वर्षी रचलेला स्वदेशीचा फटका पुण्याच्या 'जगद्हितेच्छु' वर्तमानपत्रात छापून आला. माध्यमिक शिक्षणाकरिता विनायक नाशिकला गेला. तेथे त्याच्या वाचनाच्या मूळच्या आवडीला अधिक वाव मिळाला. नागरिक सार्वजनिक वाचनालयातील जवळजवळ सर्व मराठी पुस्तके त्याने वाचून काढली. वाचलेल्या पुस्तकांचा सारांश 'सर्वसारसंग्रह' नावाच्या वहीत तो लिहीत असे. अशा अनेक वह्या त्याच्यापाशी जमल्या.

१४ वर्षांच्या विनायकाचा 'हिंदू संस्कृतीचा गौरव' हा लेख 'नाशिक वैभव' या वर्तमानपत्राने अग्रलेखाच्या खाली छापला. १८९८ साली लोकमान्य टिळक कारागृहातून सुटले. त्याप्रसंगी वयाच्या १५व्या वर्षी विनायकाने रचलेली 'श्रीटिळक-आर्यभू भेट' ही कविता पुण्याच्या 'जगद्हितेच्छु' वर्तमानपत्राने प्रसिद्ध केली. त्याचे स्वातंत्र्यप्रेम लहानपणी रचलेल्या कवितांमधूनही स्पष्ट दिसते. कथा, कविता, इतिहास, निबंध आदी सगळ्या विषयांची पुस्तके लहानपणीच त्याने वाचून काढली. त्याच्या बुद्धीला कोणताही विषय कठीण वाटत नसे. त्याच्या मनाला कोणतीही पुस्तके रुक्ष वाटत नसत. बालवयातच विनायकने वाचन, लेखन, काव्य आणि वक्तृत्वकलेतील नैपुण्य मिळवले होते.

इंग्रजांशी लढण्यासाठी जागृती व स्फुरण निर्माण करण्याकरिता या कलेचा उपयोग निर्विवादपणे झाला. पण त्याचबरोबर आपण सर्व क्षेत्रांत पारंगत झाले पाहिजे, ही त्याची मनीषा होती. शारीरिकदृष्ट्या कमकुवत राहता कामा नये, यासाठी सूर्यनमस्कार व इतर व्यायाम याचीही त्याने कास धरली. कुस्ती, नदीवर पोहायला जाणे, वाळवंटात खेळणे, आपसात दोन गट पाडून लढाईचा खेळ खेळणे, जोर-बैठका यामध्येही मन लावून विनायक रममाण होई. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात त्याप्रमाणे उपजत हुशारी व बुद्धिमत्तेच्या त्याच्या तेजाने सर्वजण विशेषतः वडीलधारी मंडळी थक्क होत असत. पण जे कमी आहे त्या गोष्टी प्रयत्नपूर्वक त्याने मिळवल्या आणि स्वतःला घडवले. आम्ही 'बि'घडलो तुम्ही बि 'घडाना' हा संदेश, त्याने त्यातून स्वातंत्र्यसमरासाठी लोकांना दिला.

★★★


ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान
साहित्य प्रतिष्ठान



# मुंगी उडाली आकाशी

प्रतिज्ञेने विनायकाच्या हृदयात प्रज्वलित झालेली स्वातंत्र्याची ज्योत धगधगू लागली होती. काव्य, निबंध, पोवाडे आणि वक्तृत्व यातील त्याच्या नैपुण्यातून ती प्रकट होत होती. अनेक तरुणांच्या हृदयातील देशभक्तीचा अंगार ती चेतवीत होती. बालवयातील त्याच्या विलक्षण नैपुण्याची प्रचीती देणारे अनेक प्रसंग आहेत. ते सांगावे तेवढे थोडेच. काव्य, पोवाडे, निबंध आणि वक्तृत्व यांच्या स्पर्धांमधून पहिला क्रमांक मिळवणे हे तर नित्याचेच झाले होते. पाठांतर, विषयाशी एकरूपता, अवांतर वाचन, उत्तम स्मरणशक्ती, तर्कशुद्ध मांडणी, अंतःकरणाचा ठाव घेणारे शब्द, बोलण्याचा वेग आणि आवेश त्याच्या या सर्व गोष्टींवर लोक लुब्ध होत. कोवळ्या वयातील त्याच्या या अफाट कर्तृत्वाने भले भले स्तिमित होत असत. 'खरोखर हे पाणी काही निराळेच आहे' अशी त्यांची धारणा होई. या 'निराळ्या पाण्या'ची कितीतरी उदाहरणे आहेत. त्यातीलच हे एक ठळक उदाहरण.

सावरकरांनी मोठेपणी 'वक्ता दशसहस्त्रेषु' ही ख्याती मिळवली. त्याची बीजे त्याने बालवयात केलेल्या उत्कृष्ट भाषणांमध्ये दडली आहेत, असे म्हणावे लागेल. कर्जत जवळच्या दहिवली गावात झालेल्या वक्तृत्व स्पर्धेमध्ये विनायक पहिला आला. त्या वेळी त्याचे वय होते अवघे १४ वर्षांचे. अध्यक्षांनी स्पर्धेचा निर्णय जाहीर करताच टाळ्यांचा कडकडाट झाला.



साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

पण बक्षीस वितरणापूर्वी भाषण करतेवेळी अध्यक्षांनी शंका व्यक्त केली. ते म्हणाले, 'कुमार सावरकरचे वय आहे केवळ १४ वर्षांचे. इतका लहान मुलगा इतक्या प्रभावी भाषेत, इतका सुंदर निबंध स्वतः लिहून भाषण करू शकेल, असे मला वाटत नाही. तरीपण त्याने भाषण मात्र छान केले. मग निबंध मोठ्या माणसाने का लिहून दिलेला असेना! म्हणून पहिले बक्षीस त्यालाच. एवढ्या लहान वयात असे सुंदर भाषण करणे हे खरोखरच कौतुकास्पद आहे.'

अध्यक्षांचे ते विचार ऐकताच विनायक ताड्कन उठून उभा राहून म्हणाला, 'अध्यक्षमहाराज, आपली समजूत साफ चुकीची आहे. निबंध मी स्वतःच आपल्या मनाने लिहिलेला आहे अन् तो लिहिताना मला आमच्या बिऱ्हाडी अनेकांनी पाहिले आहे. व्यवस्थापकांनाही मी हे दहादा सांगितले होते. तरीसुद्धा तो निबंध माझा नसावा, असा तुम्ही आरोप करता. अन् याला पुरावा काय तर म्हणे माझे लहान वय. पण लहान वय हेच जर कारण असेल तर ज्ञानेश्वरांनी बालवयातच 'ज्ञानेश्वरी' लिहिली, हे पण साफ खोटेच म्हणावे लागेल. 'गुणांची पूजा होते. गुणवानाला लिंग वा वय हा भेद कधीही आड येत नाही,' हा अर्थ सांगणारे 'गुणा पूजास्थानं गुणिषु नच लिङ्गं न च वयं' हे वचन आपल्याला ठाऊक असणारच.' विनायकचा हा उत्स्फूर्त व बिनतोड युक्तिवाद ऐकताच उपस्थितांनी टाळ्यांचा अभूतपूर्व कडकडाट केला. अध्यक्षांना मात्र तो आपला अपमान वाटला अन् रागारागाने ते ताशेरे झाडू लागले. पण इतर मंडळींनी अध्यक्षांना समजावले. त्यानंतर बक्षीस वितरण समारंभ पार पडला.

स्पर्धेच्या कार्यवाहांनी त्या दिवशी रात्री आपल्या घरी जेवायला बोलावून विनायकाचे केलेले कौतुक अन् दिलेली भेट सावरकरांच्या दृष्टीने अनमोल म्हणावी लागेल. शि. म. परांजपे यांनी सुरू केलेले 'काळ' हे ज्वलंत साप्ताहिक त्याला वर्षभर भेट मिळाले. उत्तम भाषणाबद्दल एक साप्ताहिक वर्षभर भेट मिळवणारा पहिला विद्यार्थी म्हणून या घटनेला महत्त्व आहेच. पण हा 'काळ' वाचूनच कालातीत काळाला आणि काळ्याकभिन्न काळोखाला टक्कर देण्याचे सामर्थ्य विनायकच्या मनात निर्माण झाले. त्यादृष्टीने ही भेट अनमोल ठरली.

★★★


ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान



# स्वातंत्र्याचा पुजारी

मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर पुढील शिक्षणासाठी सावरकरांनी पुण्यात फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. नाशिक येथे मित्रमेळा आणि अभिनव भारत या संघटनांच्या माध्यमातून सुरू केलेले स्वातंत्र्यजागृतीचे काम त्यांनी पुण्यातही सुरू केले होते. याच काळात इंग्रज सरकारने बंगालचे विभाजन केले. या विभाजनाला भारतीय जनतेचा विरोध होता. सभा, निदर्शने, मोर्चा या मार्गाने निषेध व्यक्त केला जात होता.

लॉर्ड कर्झनच्या दडपशाहीमुळे देशातले वातावरण तापले होते. अशा वेळी सावरकरांनी काहीतरी ठोस कृती करण्याचे मनोमन ठरवले. विदेशी कापड म्हणजे केवळ कापड नसून ते आपल्या गुलामगिरीचे चिन्ह असल्याने त्या कपड्यांची होळी करावी, म्हणजे त्याच्या ज्वालांमधून क्रांतीची ठिणगी पडेल. शंभर व्याख्यानांनी होणार नाही, असे हे काम विदेशी कापडाच्या होळीने होईल, असे त्यांना वाटले. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना ही गोष्ट समजावून सांगितली. विनायक सावरकर यांच्या नेतृत्वाखाली काही तरुणांनी यासंदर्भात लोकमान्य टिळकांची भेट घेऊन त्यांच्यापुढे आपली योजना मांडली. त्यांच्याकडून पाठिंबा व मार्गदर्शन मिळाल्यामुळे तरुणांमध्ये उत्साह संचारला. 'होळी करायची असेल तर दोन-तीन कपड्यांची न करता मोठ्या प्रमाणात करा. लोकांना तो पोरखेळ वाटता कामा नये याची काळजी घ्या',


साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

असा सल्ला लोकमान्यांनी दिला. टिळकांचा आशीर्वाद मिळाल्यावर तरुणांनी तहानभूक विसरून काम केले. शहरभर हिंडून मोठ्या प्रमाणावर विदेशी कपडे गोळा केले आणि त्यांची मोठी होळी केली. भर स्मशानात पेटवण्यात आलेल्या जंगी होळीच्या वेळी लोक उत्स्फूर्तपणे गोळा झाले होते. पण त्या वेळची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकमान्य टिळक व काळकर्ते शि. म. परांजपे यांची त्याला लाभलेली उपस्थिती. दोघांनीही स्फूर्तिदायक भाषणे करून तरुणांच्या या कृतीला मनापासून पाठिंबा दिला. विशेष म्हणजे विनायकने या वेळी केलेले भाषण लोकांना खूपच आवडले. विनायकच्या अमोघ वक्तृत्वाने ते अक्षरशः मंत्रमुग्ध झाले होते. पुणे, नाशिक आदी ठिकाणी पेटलेल्या लहान-मोठ्या होळ्यांमुळे इंग्रजांविषयी असलेला असंतोष प्रकर्षाने प्रकट झाला. इंग्रजांना या देशातून लवकर हाकलले पाहिजे, ही क्रांतीची ठिणगी या होळ्यांच्या ज्वालेतून त्यांच्या अंतःकरणातच निर्माण झाली.

फर्ग्युसन कॉलेजच्या वसतिगृहात असताना आर्य भोजनालयात ते भोजनासाठी जात असत. तेथे येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना एकत्र करून त्यांनी दर शुक्रवारी छत्रपती शिवरायांची आरती म्हणण्यास सुरुवात केली होती. ती आरती देखील त्यांनीच रचली होती. सिंहगडचा पोवाडा आणि बाजी प्रभू देशपांडे यांचा पोवाडा देखील सावरकरांनी कॉलेजमध्ये असतानाच रचला. याच काळात शेकडो लेख लिहिले. हजारो पुस्तके वाचली. 'अभिनव भारत' या गुप्त क्रांतिकारी संस्थेचे त्यांचे कार्य चालूच होते. १९०३ साली कॉलेजमध्ये शिकत असताना त्यांनी लिहिलेले 'जयोस्तुते' हे स्वतंत्रतेचे स्तोत्र म्हणजे त्यांच्या अलौकिक व भव्योदात्त प्रतिभेचा अनोखा चमत्कार म्हणावा लागेल.

स्वातंत्र्य हा त्यांचा श्वास होता. तेच त्यांच्या हृदयाचे गाणे होते याची प्रचीती या स्तोत्राच्या रचनेतून येते. पुढे आयुष्यभर स्वातंत्र्यासाठी त्यांनी जे सर्वंकष काम केले त्याचे सार या स्तोत्रामधून व्यक्त झालेले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी व त्याच्या रक्षणासाठीच त्यांनी आपले आयुष्य वेचले. सावरकर हे नाव उच्चारताच 'स्वातंत्र्यवीर' ही बिरुदावली चटकन डोळ्यांसमोर उभी राहते ती त्यामुळेच!

★★★



ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान



# शत्रूच्या गुहेत सिंहाचा छावा

देशाच्या स्वातंत्र्यासाठी गुप्तपणे व उघडपणे हालचाली सुरू असतानाच सावरकरांचे अभ्यासावरचे लक्ष अजिबात विचलित झाले नव्हते. २१ डिसेंबर १९०५ला ते बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. वकिलीच्या पहिल्या परीक्षेत यश मिळवून त्यांचा दुसऱ्या वर्षाचा अभ्यास मुंबईत सुरू होता. त्याच वेळी लंडनस्थित शामजी कृष्णवर्मा यांनी वर्तमानपत्रात दिलेले एक निवेदन त्यांच्या वाचनात आले. प्रखर देशभक्त असलेल्या शामजी कृष्णवर्मा यांनी तेथे 'इंडिया हाऊस' नावाचे केंद्र स्थापन केले होते. हे केंद्र अधिक बलवान करण्यासाठी त्यांना बुद्धिमान, देशभक्त तरुण हवे होते. ते मिळवण्यासाठी त्यांनी वर्तमानपत्रात निवेदन देऊन शिष्यवृत्त्या घोषित केल्या होत्या. लोकमान्य टिळकांनी त्यासाठी त्यांना शिफारस पत्र दिले होते. बॅरिस्टर होण्यासाठी म्हणून शिष्यवृत्ती घेऊन सावरकर ३ जुलै १९०६ला लंडनला पोहोचले. त्या वेळी त्यांचे वय होते अवघे २३ वर्षे!




साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

त्यांचा चार वर्षांचा लंडनचा मुक्काम म्हणजे स्वातंत्र्यासाठी केलेल्या क्रांतिकार्याचा रोमहर्षक आणि प्रेरणादायी इतिहास आहे. त्यांना बॅरिस्टर तर व्हायचे होतेच, पण इंग्लंडला जाण्याचा त्यांचा अंतस्थ हेतू स्वातंत्र्यासाठी शत्रूच्या शिबिरात जाऊन मुसंडी मारणे हा होता. त्यांचा हा हेतू निखालसपणे सफल झाला, असेच म्हणावे लागेल.

इंग्लंडमधील चार वर्षांच्या मुक्कामात विविध पातळीवर त्यांनी इतके विलक्षण कार्य केले की त्याला तोडच नाही. ९ जून १९०६ला इंग्लंडला जाण्यासाठी त्यांनी 'पर्शिया' जहाजावर पाय ठेवला. जहाजातच रमेशचंद्र दत्त आणि हरनामसिंग या दोघांशी ओळख करून घेतली आणि त्यांना देशभक्तीची दीक्षा दिली.

वादविवाद, चर्चा, भाषणे यांमधून भारतीय तरुणांच्या मनात क्रांतीची स्फुल्लिंग चेतवण्याचे त्यांचे काम सुरू होतेच. पण शस्त्रास्त्रे जमवणे, बॉम्ब बनवण्याचे प्रशिक्षण, गुप्त पत्रके काढणे, लेख लिहिणे, तेथे घडणाऱ्या घटनांची बातमीपत्रे वृत्तपत्रांकडे पाठवणे, भारतातून येणाऱ्या तरुणांशी संपर्क साधून त्यांना आपल्या कार्यात ओढणे अशा अनेक कामांत त्यांचा तेथे पुढाकार होता. अनेक तरुणांच्या मनात क्रांतीचा मंत्र फुंकल्यामुळे लंडन शहरात स्वातंत्र्याचा विचार करणारी मंडळी एकत्र येऊ लागली. त्यांच्या सामूहिक प्रयत्नातून शेकडो प्रशिक्षित तरुण तयार झाले. इंग्रजांनी १८५७च्या स्वातंत्र्याच्या उठावाला, 'शिपायांचे बंड' असे संबोधले होते. त्यातील पुढारी स्वार्थी व लुटारू होते, हे बंड इंग्रजांनी लीलया मोडून





ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान

साहित्य प्रतिष्ठान



काढले, असा खोटा इतिहास प्रस्थापित करण्याचा प्रयत्न त्या वेळी अनेक इंग्रज लेखक करीत होते.

१० मे १९०७ला १८५७च्या क्रांतियुद्धाच्या उठावाचा अभ्यास करून '१८५७चे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ साकारला. जुन्या कागदपत्रांचा अभ्यास करून इंग्रज लेखकांचे सर्व मुद्दे त्यांनी त्यात खोडून काढले होते. सावरकरांचा हा ग्रंथ इतका स्फूर्तिदायक झाला, की क्रांतिकारकांची ती पवित्र 'भगवद्‌गीता' ठरली. मराठीत लिहिलेला हा जहाल ग्रंथ हिंदुस्थानात कुणीही छापण्यास तयार नसल्याने त्याचे इंग्रजीत भाषांतर करण्यात आले. इंग्लंडमध्ये तो छापला जाणे अशक्यच होते. बऱ्याच प्रयत्नांनंतर अखेर तो हॉलंडमध्ये छापला गेला. या ग्रंथामधील तेजस्वी विचार लोकांपर्यंत जाणे इंग्रजांना परवडणारे नव्हते. ग्रंथ प्रकाशित होण्यापूर्वीच त्यांनी तो जप्त केला. प्रकाशनापूर्वीच जप्तीचा वरवंटा फिरवला जाणारा ग्रंथ म्हणून त्याचे मोल अनमोल म्हणावे लागेल. १८५७च्या स्वातंत्र्ययुद्धाचा सुवर्ण महोत्सव लंडनमध्ये साजरा करण्यामध्येही सावरकरांचा सिंहाचा वाटा होता. या समारंभात सावरकरांनी व्यक्त केलेल्या तेजस्वी विचारांनी उपस्थितांची मने अक्षरशः भारावून गेली. त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. १८५७च्या पूर्वतयारीमध्ये त्या काळी एका गावाहून दुसऱ्या गावाला 'चपात्या' पाठवल्या जात.


साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com



'अन्नाला स्मरून घेतलेली शपथ' यादृष्टीने त्या वेळी 'चपात्यांना' खूप महत्त्व प्राप्त झाले होते. सुवर्ण महोत्सव समारंभाच्या अखेरीस चपात्यांचा प्रसाद वाटून त्या घटनेची स्मृती जागवण्यात आली.

लंडनमध्ये मदनलाल धिंग्रा या क्रांतिकारी तरुणाने कर्झन वायलीची पिस्तुलातून गोळ्या घालून केलेली हत्या ही एक खळबळजनक घटना म्हणावी लागेल. त्या वेळी युरोपात इंग्रजांचे साम्राज्य होते. इंग्लंडच्या राजधानीत एका भारतीय तरुणाने एका इंग्रजी अधिकाऱ्याला यमसदनाला पाठवले, हा मोठाच पराक्रम होता. या घटनेने इंग्रजांचे साम्राज्य चांगलेच हादरले. मदनलाल धिंग्रा यांच्या या पराक्रमी कृत्याच्या मागे सावरकरांचा मेंदू होता. इंग्रजांचे गुलाम बनलेल्या लंडनमधील भारतीयांनी मदनलालचा निषेध करण्यासाठी सभा बोलावली. पण सावरकरांनी त्या सभेस उपस्थित राहून निषेधाच्या ठरावाला कडाडून विरोध केला. त्यामुळे निषेधाचा ठराव संमत न होताच सभा उधळली गेली.



ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान

प्रत्यक्ष भारतामध्येही क्रांतिकारी घटनांचे पडसाद उमटत होतेच. १८-१९ वर्षांच्या खुदीराम बोसने जिल्हा मॅजिस्ट्रेटच्या अंगावर बॉम्ब फेकला होता. या प्रकरणात फितूर झालेल्या नरेन्द्र गोस्वामी याला ठार करण्यात आले होते. त्यामुळे क्रांतीचा वणवा बंगालभर पेटला होता. २१ डिसेंबर १९०९ रोजी अनंत कान्हेरे या तरुणाने नाशिक येथे जॅक्सनचा गोळ्या घालून वध केला. महाराष्ट्र, बंगाल, पंजाब, बिहार आदी अनेक प्रांतांत इंग्रज सरकारच्या विरोधात कटाच्या घटना घडल्या होत्या. नाशिकच्या कटात सावरकरांचे अनेक बालमित्र पकडले गेले होते. वडीलबंधू गणेश सावरकर यांना जन्मठेपेची शिक्षा झाली होती. लहान भाऊ नारायण सावरकर यालाही सरकारने पकडले होते. या सर्व क्रांतिकार्याच्या मुळाशी विनायक सावरकर आहेत, अशा गुप्त बातम्या इंग्रजांकडे असल्याचे त्यांनी त्यांच्याभोवती फास आवळण्याच्या हालचाली सुरू केल्या होत्या.

भरपूर काम, शारीरिक मेहनत, बौद्धिक हुशारी आणि तशातच ठिकठिकाणांहून कानावर येणाऱ्या विपरीत बातम्या यामुळे सावरकर खूप आजारी पडले. त्यांना न्यूमोनिया झाला. कमालीचा अशक्तपणा आला. त्या वेळी वेल्स मधील (ग्रेट ब्रिटनमधील वेल्स हे ठिकाण नसून  तो एक परगणा, विभाग आहे. इंग्लंड, वेल्स, आयर्लंड, स्कॉटलंड) डॉ. मुथु नावाचे मद्रासी हिंदू रुग्णालय चालवीत होते. त्यांनी आपल्या रुग्णालयात सावरकरांना आणून विनामूल्य औषधपाणी व उपचार करून त्यांची सर्व प्रकारची काळजी घेतली. थोडेसे बरे वाटल्यानंतर मित्रांनी विश्रांतीसाठी त्यांना फ्रान्समध्ये आणले. या विश्रांती काळातील त्यांचा विशेष हा की गुरुमुखी लिपी शिकून आणि ग्रंथसाहेबाचे अध्ययन करून त्यांनी शिखांचा इतिहास लिहिला. तेथून ते इंग्लंडला परत आल्यावर इंग्रज सरकारच्या पोलिसांनी त्यांना अटक केली आणि हिंदुस्थानात राजद्रोहाचा गुन्हा केल्याचा त्यांच्यावर आरोप ठेवून तेथे खटला चालवण्यासाठी त्यांची हिंदुस्थानात रवानगी केली. सिंहाच्या छाव्यानं शत्रूच्या गुहेत शिरून जी कामगिरी केली त्याला इतिहासात तोड नाही.

★★★


साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

# ।। जयोस्तुऽते श्रीमहन्मंगले ।।

जयोस्तुते श्रीमहन्मंगले। शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवति। त्वामहं यशोयुतां वंदे।।धृ।।

राष्ट्राचे चैतन्य मूर्त तूं, नीति संपदांची
स्वतंत्रते भगवति। श्रीमती राज्ञी तू त्यांची
परवशतेच्या नभांत तूंची आकाशी होशी
स्वतंत्रते भगवति। चांदणी चमचम लखलखशी।।

गालावरच्या कुसुमी किंवा कुसुमांच्या गाली
स्वतंत्रते भगवति। तूच जी विलसतसे लाली
तूं सूर्याचे तेज उदधिचे गांभीर्यहि तूंची
स्वतंत्रते भगवति। अन्यथा ग्रहण नष्ट तेंची।।

मोक्ष मुक्ति ही तुझीच रुपें तुलाच वेदांती
स्वतंत्रते भगवती। योगिजन परब्रह्म वदती
जे जे उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर तें तें
स्वतंत्रते भगवति। सर्व तव सहचारी होते।।

हे अधम रक्त रंजिते। सुजन-पुजिते। श्री स्वतंत्रते
तुजसाठिं मरण तें जनन
तुजविण जनन ते मरण
तुज सकल चराचर शरण
भरतभूमीला दृढलिंगना कधिं देशिल वरदे
स्वतंत्रते भगवति। त्वामहं यशोयुतां वंदे।।

हिमालयाच्या हिमसौधाचा लोभ शंकराला
क्रिडा तेथे करण्याचा कां तुला वीट आला
होय आरसा अप्सरसांना सरसे करण्याला
सुधाधवल जान्हवीस्त्रोत तो कां गे त्वां त्यजिला।।

स्वतंत्रते। ह्या सुवर्णभूमीत कमती काय तुला
कोहिनूरचे पुष्प रोज घे ताजें वेणीला
ही सकल-श्री-संयुता आमची माता भारती असतां
कां तुवां ढकलुन दिधली
पूर्वीची ममता सरली, परक्यांची दासी झाली
जीव तळमळे, कां तूं त्यजिले उत्तर ह्याचें दे
स्वतंत्रते भगवति त्वामहं यशोयुतां वंदे।।



ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान



# त्रिखंडात गाजलेली समुद्रउडी

शत्रूच्या गुहेत शिरून त्याच्या उरात धडकी भरवण्याचे बिनतोड काम केल्यावर हिंदुस्थानात परतत असताना शत्रूच्या हातावर तुरी देऊन निसटण्यासाठी सावरकरांनी मोरिया बोटीतून अथांग समुद्रात मारलेली उडी म्हणजे ऐतिहासिक साहसाची एक अनोखी घटना म्हणावी लागेल. ही समुद्रउडी त्रिखंडात गाजली. महापराक्रमी वीर हनुमानानंतर समुद्रउडी घेणारा एकमेव वीर म्हणजे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर.

१ जुलै १९१० रोजी सावरकर मोरिया बोटीत बसले. पण त्यांच्या मनात मात्र इंग्रजांना 'मोरु' करण्याचे विचारचक्रच सुरू होते. बोटीचे निरीक्षण करून तिच्या 'पोर्ट होल'मधून पसार होण्याचा त्यांनी मनाचा निश्चय केला. बोट मार्सेलिस बंदरात यंत्रामध्ये झालेल्या बिघाडामुळे थांबली होती. हीच निसटण्याची नामी संधी आहे, असा विचार करून त्यांनी आपला बेत नक्की केला. रात्रंदिवस चोवीस तास डोळ्यांत तेल घालून पहारा देणारे दोन इंग्रज पहारेकरी त्यांच्यावर लक्ष ठेवून होते. पण सावरकरांनी त्यांच्या हातावर तुरी दिल्या. एकाचे नाव होते पार्कर. सावरकरांनी त्याला जेथल्या तेथे 'पार्क' केले असे म्हणता येईल. तर दुसऱ्याचे नाव होते पॉवर. त्याला सावरकरांनी आपली 'पॉवर' दाखवली.


साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

## सावरकरांनी मार्सेलिस बंदरात समुद्रात उडी मारली तो दिवस होता ८ जुलै १९१० हा.

शौचकूपात शिरताच सावरकरांनी त्याचे दार घट्ट लावून घेतले आणि आपला अंगावरचा अंगरखा काचेच्या दरवाजावर अडकवला. त्यामुळे आतली हालचाल बाहेरच्या पहारेकऱ्यांना दिसणे बंद करीत, खरचटण्याची, ओरखड्यांची व चामडी सोलवटण्याची तमा न बाळगता त्यातून ते पसार होण्यात यशस्वी झाले. एका शिपायाच्या ही गोष्ट लक्षात आल्यावर दरवाजा तोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण आतून कडी लावलेली असल्याने तो प्रयत्न असफल झाला. बोटीवर तैनात असलेल्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत धूळ फेकून समुद्रात पोहण्याचे त्यांचे काम एव्हाना सुरू झाले होते. सर्व अंग सोलवटून निघाले होते. त्यावर समुद्राचे खारे पाणी पडत असल्याने वेदना असह्य होत होत्या. पण सावरकरांनी तशाही स्थितीत पोहत फ्रान्सचा किनारा गाठला. जुलमी इंग्रज सरकारच नव्हे, तर साक्षात मृत्यूदेखील सावरकरांचे हे अभूतपूर्व धाडस पाहून किंचित काळ चक्रावला असेल!

दुसऱ्या राष्ट्राच्या हद्दीत गेल्यावर इंग्रजांचे पोलीस आपल्याला पकडू शकणार नाहीत, हा कायद्याचा शिरस्ता सावरकरांना माहीत होता. पण इंग्रज शिपायांच्या लालचीला बळी पडून फ्रान्सच्या पोलिसांनी त्यांना इंग्रज पोलिसांच्या स्वाधीन केले. मोरिया बोटीतील पोलीस अधिकाऱ्यांनी कडेकोट बंदोबस्तात त्यांना घेऊन जाताना त्यांचा छळ सुरू केला. शिव्या, चिडचीड, मारहाण असा छळ होत असलेल्या अवस्थेतही सावरकर पूर्ण भानावर होते. त्यांनी नरसिंहाचे रूप धारण केले आणि दरडावणीच्या स्वरात अधिकाऱ्यांना इशारा दिला.

'लक्षात ठेवा. आम्ही घराबाहेर पडलो तेथे मुळी तळहातावर शीर घेऊन. आम्ही बॉम्बगोळ्यांशी खेळणारे लोक. आम्हाला मृत्यूचे किंचितही भय नाही. तुम्हा सगळ्यांशी कदाचित मला लढता येणार नाही. पण वेळ आल्यास एकाचा तरी मुडदा पाडल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा तुम्ही सांभाळा.' हा खणखणीत इशारा ऐकताच छळ बंद झाला. सावरकरांच्या या ऐतिहासिक समुद्रउडीला ८ जुलै २०१० मध्ये शंभर वर्षे पूर्ण होत आहेत.

★★★



ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान



# काळ्या पाण्यात दडलेली भविष्यवाणी

हिंदुस्थानात येताच मुंबई येथे विशेष न्यायालय निर्माण करून सावरकरांवर इंग्रज सरकारने खटला चालवला. फ्रान्सच्या किनाऱ्यावर त्यांना अटक झालेली असल्यामुळे हिंदुस्थानात खटला चालवता येणार नाही, असा आक्षेप सावरकरांच्या वकिलांनी घेतला. ते आंतरराष्ट्रीय नियमांच्या विरुद्ध असून फ्रान्सच्या सार्वभौमत्वाला बाधा आणणारे आहे. ही हरकत फेटाळून खटला सुरू करण्यात आला. नाशिक कटाच्या दुसऱ्या खटल्याचे कामकाजही सुरू होतेच. दोन्ही खटल्यांचे निकाल लागून सावरकरांना दोन जन्मठेपेची म्हणजे ५० वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली. 'काळेपाणी' हा शब्द उच्चारताच लोक त्यावेळी प्रचंड घाबरत असत. पण सावरकरांना दोन जन्मठेपेच्या शिक्षा होऊनही हा वीर डगमगला नाही. ही शिक्षा भोगण्यासाठी त्यांना अंदमानला पाठवण्यात येणार होते. अंदमानला पाठवण्यापूर्वी त्यांना डोंगरीच्या कारागृहात ठेवण्यात आले होते. तेथे भेटीस आलेल्या स्वतःच्या पत्नीला साखळदंडात बद्ध असलेल्या सावरकरांनी सांगितलेल्या संसाराच्या महान तत्त्वज्ञानातून त्यांच्या धीरोदात्त वृत्तीची प्रचीती येते.



साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

'केवळ मुला-मुलींची वीण वाढवणे आणि चार काटक्या जमवून घरटी बांधणे यालाच जर संसार म्हणायचे तर असला संसार कावळे-चिमण्यासुद्धा करतात. पण संसाराचा याहून भव्यतर अर्थ घ्यायचा असेल तर पुढे हजारो लोकांच्या घरातून सोन्याचा धूर निघावा म्हणून स्वतःची चूळ-बोळकी फोडून टाकणे, याचे नाव संसार' अशा अजरामर शब्दात सावरकरांनी संसाराचे तत्त्वज्ञान प्रकट केले होते.

अंदमानच्या काळकोठडीत नेण्यापूर्वी सावरकरांना ठाण्याच्या तुरुंगात काही दिवस ठेवण्यात आले होते. तेथून पुढे त्यांची अंदमानला रवानगी करण्यात आली. ठाण्याच्या तुरुंगात बद्ध केल्यावर तेथील अधिकारी कुत्सितपणे म्हणाला, 'अरे देवा! ५० वर्षांची शिक्षा! ...पण दयाळू ब्रिटिश सरकार ५० वर्षांनी नक्की सोडेल!' खिजवण्यासाठी काढलेले हे उद्गार ऐकूनही सावरकर अगदी शांत आणि स्थिरचित्त होते. विलक्षण आवेशात पण पूर्ण आत्मविश्वासाने त्यांनी दिलेल्या प्रत्युत्तराची मात्र ऐतिहासिक म्हणून नोंद झालेली आहे. 'ब्रिटिश सरकार तरी इथे ५० वर्षे टिकणार आहे का ?' असा मर्मभेदी सवाल सावरकरांनी त्या ब्रिटिश अधिकाऱ्याला केला होता. सावरकरांचा हा खणखणीत सवाल नुसता सवाल नव्हता. सावरकरांची ती भविष्यवाणी अचूक ठरली. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला. पुढच्या ३६ वर्षांतच ब्रिटिशांना हिंदुस्थानातून आपला गाशा गुंडाळावा लागला. राजकीय कारणासाठी दोन जन्मठेपींची म्हणजे ५० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आलेला एकमेव देशभक्त, अशी सावरकरांची इतिहासात नोंद झालेली आहे. पण '५० वर्षे ब्रिटिश सरकार या देशात टिकणार नाही,' अशी भविष्यवाणी आत्मविश्वासाने उच्चारणारा एकमेव द्रष्टा म्हणूनही या उद्गारांना विशेष महत्त्व आहे. सावरकरांना 'भविष्य'शास्त्र कितपत माहीत होते, याबद्दल अनेक जण अनभिज्ञ आहेत. पण ते 'भविष्य' घडवणारे होते, याबद्दल मात्र कुणाचेही दुमत होणार नाही. 'काळे पाणी' ही शिक्षा असेल; पण ती सावरकरांची अचूक भविष्यवाणी देखील आहे. त्यादृष्टीने सावरकर म्हणजे निराळेच पाणी होते, असे म्हणावे लागेल.

★★★


ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान



# अंदमान नव्हे; तीर्थक्षेत्र

सावरकरांच्या आयुष्यात अंदमान पर्वाला असाधारण महत्त्व आहे. चेन्नईच्या पूर्वेला आणि कोलकात्याच्या दक्षिणेला ७०० मैलावरील एका बेट समूहाला अंदमान हे नाव आहे. लहरी हवामान, जिकडेतिकडे अरण्य, चिखल व घाणीचे साम्राज्य, मच्छर आणि जळवाचा उच्छाद यासाठी अंदमान प्रसिद्ध. इंग्रजांच्या राजवटीत जन्मठेपेचे कैदी मुद्दाम या बेटावर पाठवले जात. खुनी, दरोडेखोर व डाकू यांचा त्यात समावेश असे. कुणी हवामान न मानवल्यामुळे तेथे मरून जात. पण अनेक जणांना छळाच्या यमयातना सहन न झाल्यामुळे त्यांना प्राण सोडावे लागे. ४ जुलै १९११ रोजी सावरकर अंदमानच्या काळकोठडीत बंदिस्त झाले आणि २१ जानेवारी १९२१ रोजी त्यांना या यमनगरीतून बाहेर काढण्यात आले.

दहा वर्षांचा त्यांचा हा कारावास म्हणजे अमानुष छळ, प्रचंड कष्ट, धीरोदात्त वृत्ती आणि प्रेरक कार्य यांचा रोमहर्षक इतिहास आहे. काळ्या पाण्याच्या शिक्षेत त्यांना अक्षरशः यमयातनांना तोंड द्यावे लागले. काथ्या कुटून हात रक्तबंबाळ झाले. तेलघाण्याला जुंपल्याने अनेक वेळा ते मूर्च्छित झाले. सकाळी ६ ते सायंकाळी ४ या वेळात सलग सात दिवस त्यांना हातकडीची



साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

शिक्षा भोगावी लागली. अंग ठणकणारे, शरीर थकणारे काम करताना त्यांनी यमयातना सहन केल्या. पण या परिस्थितीतही सावरकर हिंमत हरले नाहीत. वाट्याला येणारी प्रत्येक शिक्षा व काम ही इष्टापत्ती समजून त्याचा त्यांनी आपले ईप्सित साध्य करण्याकरिता उपयोग करून घेतला.

दुष्ट बारीचा अमानुष छळ, वाचायला काही नाही, बोलायला माणूस नाही, तेलघाण्याचे काम आणि रुक्ष जेवण या सर्व गोष्टी इतक्या भयंकर होत्या की, बंद्यांना वेड लागायची पाळी येई. इंदुभूषण नावाच्या बंद्याने अखेर या जाचाला कंटाळून आत्महत्या केली. सावरकरांनी धैर्य खचू लागलेल्या अनेक बंद्यांना धीर देण्याची व उमेद वाढवण्याची कामगिरी बजावली. 'घाबरू नका. एक दिवस असा उगवेल, की याच कारागृहात तुमचे पुतळे उभारले जातील आणि अंदमान हे भारतीय यात्रेकरूंचे महन्मंगल तीर्थक्षेत्र होईल,' अशा आश्वासक शब्दांत त्यांनी अनेकांना धीर दिला.

उल्हासकर दत्त नावाचा बंदी वेडा झाला. इंदुभूषणने आत्महत्या केली. या गोष्टीची बारी जेव्हा थट्टा उडवू लागला तेव्हा सावरकरांनी त्याला चांगलेच झापले. 'सध्याची स्थिती लवकर न बदलल्यास, राजबंद्यांना संप पुकारावा लागेल. लक्षात ठेवा.' या भाषेत त्यांनी





ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान
साहित्य प्रतिष्ठान



बारीला ठणकावले. राजबंद्यांची संघटना त्यांनी बांधली. अंदमानात त्यांनी शुद्धीकार्यही केले. कुणी मुसलमान थाळीला शिवला की हिंदू बाटला गेला, अशी समजूत असल्याने अनेक जण मुसलमान बनले होते. सावरकरांनी त्यांना पुन्हा हिंदू धर्मात घेतले आणि अशा भाकडकथांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले.

अंदमानच्या काळ्याकुट्ट परिस्थितीतही सावरकरांचे मन सर्जनशीलतेचा ध्यास घेण्याइतके ताजे व टवटवीत होते. 'कमला' आणि 'गोमांतक' ही त्यांची काव्ये या बंदीशाळेतच जन्माला आली. ना कागद, ना पेन्सिल अशा वेळी कोठडीच्या भिंतीचा त्यांनी कागद बनवला. तर विटांचे तुकडे पेन्सिल बनली. श्लोक रचणे आणि ते पाठ करणे हा त्यांचा हातचा मळ होता. मूर्तीदुजीती, महासागर यांसारखी दीर्घकाव्ये आणि चांदोबा चांदोबा भागलास का, जगन्नाथाचा रथोत्सव, आकांक्षा यांसारखी कितीतरी स्फुट काव्ये त्यांनी अंदमानच्या भीषण वातावरणात प्रसवली.



साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

अंदमानचा तुरुंग हा इंग्रज सरकारच्या क्रौर्याची अमानुष व काळीकुट्ट कहाणी आहे, याबद्दल संदेह नाही. पण अंदमान पर्व म्हणजे स्वातंत्र्याचे कर्णधार असलेल्या सावरकरांची अलौकिक बुद्धिमत्ता, प्रतिभा आणि सहनशीलतेचा आदर्श व प्रेरक इतिहासही आहे. अंदमान हे आज भारतीयांचे महन्मंगल तीर्थक्षेत्र झाले आहे. अंदमानची आपल्या मनातली प्रतिमा काळ्या पाण्याच्या शिक्षेच्या पलीकडे जाऊ देत नव्हती. त्याला सावरकरांमुळे छेद मिळाला आहे. २९ डिसेंबर १९४३ रोजी सुभाषचंद्र बोस अंदमानला गेले होते. भारतावर इंग्रजी सत्ता असतानाही सुभाषबाबूंनी तेथे भारतीय ध्वज फडकावला, असे इतिहास सांगतो.

अंदमानचा परिसर ८२४९ चौरस मीटर क्षेत्रफळाचा आहे. केवळ तीन जिल्हे आणि तीन लाख लोकसंख्या. चारही बाजूंनी समुद्र. जवळपास ६५०० कि.मी. लांबीची समुद्र सीमा. आजूबाजूला बेटंच बेट. त्यातही काही बेटांवर बोटावर मोजण्याइतकी मनुष्यवस्ती. उर्वरित कितीतरी बेटं जंगलांनी व्यापलेली असून एकूण ९२ टक्के भाग जंगलाने व्यापलेला आहे. वर्षभरात भरपूर पाऊस तेथे कोसळत असतो. अंदमान, सेल्युलर जेल, पोर्ट ब्लेअर ही पर्यटन केंद्रे बनली आहेत. प्रगतीच्या या प्रवासात भारतीय स्वातंत्र्याचे मर्म आजही कायम आहे व पुढेही राहणार आहे, त्याचे श्रेय सर्वस्वी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे आहे.

★★★


ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान



# अस्पृश्यांचा कडवा कैवारी

अंदमानच्या अंधारकोठडीतून १९२१ साली मोकळा श्वास घेण्यासाठी बाहेर पडलेले स्वातंत्र्यवीर सावरकर भारतामध्ये पुढे तीन वर्षे कैदेतच होते. बंगालमधल्या अलिपूर व कर्नाटकमधल्या विजापूर तुरुंगाची हवा चाखल्यानंतर त्यांना रत्नागिरीच्या तुरुंगात ठेवण्यात आले. अखेर ६ जानेवारी १९२४ रोजी इंग्रज सरकारने त्यांना स्थानबद्ध केले. पण रत्नागिरी सोडून न जाण्याचा आदेश त्यांच्यावर बजावण्यात आला.

जवळजवळ १३ वर्षे रत्नागिरीत स्थानबद्ध असतानाही सावरकर एक क्षणही स्वस्थ बसले नाहीत. अस्पृश्यता हा हिंदू समाजाला लागलेला अनेक वर्षांचा शाप दूर करण्याचा प्रामाणिक आणि निर्भीड प्रयत्न त्यांनी केला. आजकाल राजकारणासाठी अस्पृश्यतेबद्दल बोलले जाते. पण सावरकरांना 'हिंदू सारा एक' करायचा होता. त्यासाठी अस्पृश्यतेला मूठमाती देण्याकरिता त्यांनी भगीरथ प्रयत्न केले. १९२५ पासून गणेशोत्सव अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्यासाठी चळवळ उभारून निरनिराळे प्रयोग केले. वृत्तपत्रांत, साप्ताहिकांत व मासिकांत अस्पृश्यतेच्या विरुद्ध केवळ लेखन करून प्रसिद्धी मिळवणे हा त्यांचा राजकारणी उद्देश नव्हता. अनेक सामाजिक उपक्रम राबवून त्यामध्ये कथित अस्पृश्यांना त्यांनी मानाचे स्थान दिले. महारवाड्यात जाऊन भजने करणे, व्याख्याने देणे, शाळांमधून स्पृश्यास्पृश्य

मुलांना एकत्र बसवणे, शिवाशीव न पाळणे, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आदी जातींच्या लोकांसह अस्पृश्यांच्या घरी जाऊन तिळगूळ वाटणे, महिलांचे संमिश्र हळदीकुंकू समारंभ, सहभोजनाचे उपक्रम करणे, आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार, अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मिळवून, त्यांना पौरोहित्य करण्याचा अधिकार देणे अशा अनेक गोष्टी सावरकरांनी करून अस्पृश्यतेविरुद्धची चळवळ परिपुष्ट केली.

रत्नागिरीत अस्पृश्यांसाठी बांधलेले स्वतंत्र पतितपावन मंदिर, त्या मंदिरात भागोजी शेठ कीर या भंडारी जातीच्या माणसाच्या हस्ते केलेली श्री लक्ष्मी-नारायण मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व या समारंभास उपस्थित राहिलेले मसुरकर महाराज, पाचलेगावकर महाराज, शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी, चौंडे महाराज आदी संत-महंत ही त्यावेळी रत्नागिरीत घडलेली ही ऐतिहासिक घटना म्हणावी लागेल. त्याचे संपूर्ण श्रेय सावरकरांकडे जाते.

महान समाजसुधारक विठ्ठल रामजी शिंदे यांनी सावरकरांचे हे समाजसुधारणेचे काम पाहून 'खरे चालते बोलते पतितपावन देव' या शब्दात त्यांचे कौतुक केले आणि 'देवाने माझे उरलेले आयुष्य त्यांना द्यावे' अशी इच्छा व्यक्त केली. 'धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर' ही सावरकरांची ठाम विचारसरणी असल्याने ख्रिश्चन व मुस्लिम धर्मात गेलेल्या हिंदूंना त्यांनी पुन्हा आपल्या धर्मात समारंभपूर्वक घेण्याचे अनेक उपक्रम केले. आपल्याच धर्मबंधूंना निष्कारण पशुहूनही अस्पृश्य लेखणे हा मनुष्यजातीचाच नव्हे, तर आपल्या स्वतःच्या आत्म्याचाही घोर अपमान आहे, असे त्यांचे म्हणणे आहे.

धर्माचा कोणत्याही दृष्टीने विचार केला तरी अस्पृश्यतेच्या अमानुष रूढीचे समर्थन करणे अशक्य आहे. एतदर्थ धर्माची आज्ञा म्हणूनच ती रूढी नष्ट झाली पाहिजे. न्यायाच्या दृष्टीने, धर्माच्या दृष्टीने, माणुसकीच्या दृष्टीने ते कर्तव्य आहे म्हणूनच अस्पृश्यतेचे जोखड आपण हिंदूंनी साफ मोडून काढले पाहिजे. त्यापासून आजच्या परिस्थितीत लाभालाभ काय, हा प्रश्न दुय्यम आहे, अशी सावरकरांची विचारसरणी होती.

★★★


ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान
साहित्य प्रतिष्ठान



# चपखल मराठी शब्दांचे जनक सावरकर

मराठी भाषा मृतवत् झाली असल्याची हाकाटी आज सुरू आहे आणि त्या अनुषंगाने दुकानांवरील मराठी पाट्या, त्याचप्रमाणे न्यायालयांचे निर्णय मराठी भाषेतून मिळावेत, याबद्दल चळवळीही चालू आहेत. पण स्वातंत्र्यवीर सावरकरांनी मराठी भाषा सुप्रतिष्ठित होण्यासाठी भाषाशुद्धीचा प्रचार, प्रसार व त्यासंबंधीचा आग्रह राष्ट्रीय विचाराने प्रेरित होऊन धरला, हे महत्त्वाचे मानावे लागेल. भाषा ही राष्ट्राच्या अस्मितेशी संबद्ध आहे, ही त्यांची विचारसरणी होती. १९२५ मध्ये एप्रिल व मे महिन्यात 'केसरी'मधून त्यांनी भाषाशुद्धीवर लेख लिहिले. त्याकाळी त्याचे तीव्र पडसाद उमटून विरोधकांनी अनेक आक्षेप नोंदवल्यामुळे ही लेखमाला गाजली.



साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

सावरकरांनी सप्टेंबर ते नोव्हेंबर महिन्यात त्या आक्षेपांना सणसणीत उत्तरे देऊन त्याचा प्रतिवाद केला. राष्ट्रीय विचाराबरोबरच मराठीने इंग्रजी, उर्दू, फारसी आदी परकीय भाषेतील शब्द पचवून (ज्या वस्तु संपूर्ण नवीन होत्या) आपले स्वतःचे सामर्थ्य वाढवले पाहिजे, असे त्यांचे सांगणे असे. सावरकरांची भाषाशुद्धीची चळवळ त्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाची असून त्यांनी मराठी भाषेला अनेक नव्या शब्दांची देणगी दिली, असे म्हणावे लागेल. भाषाशुद्धीची चळवळ चालवतेवेळी त्यांच्यावर अनेकांनी टीका केली. टिंगलटवाळी करणारे लोकही निघाले, पण सावरकर त्यांना पुरून उरले. आरंभीचे टीकाकार असलेले अनेक जण सावरकरांचे नंतर निस्सीम उपासक बनल्याचीही इतिहासात नोंद आहे.

आज मराठी भाषेत अध्यापक, प्राध्यापक, आचार्य, प्राचार्य, हुतात्मा, महापौर, विधिमंडळ, अर्थसंकल्प, नेपथ्य, दिग्दर्शक, पार्श्वसंगीत, दिनांक, चित्रपट, मध्यंतर, ध्वनिमुद्रिका, परिपत्रक, ध्वनिक्षेपक, विसर्जन, कार्यवाह, कोषाध्यक्ष, गणसंख्या, अभियान विश्वस्त, ग्रंथभांडार, मुख्याध्यापक, ज्ञानशाखा, समास, दूरध्वनी, शस्त्रसंधी, कार्यालय, सेवानिवृत्त, नगरपालिका, निवृत्तीवेतन, महापालिका, राजसत्ता, पदच्युत, शिरगणना असे कितीतरी चपखल मराठी शब्द रूढ झालेले आपल्याला दिसतात. पण त्याचे जनक सावरकर आहेत हे किती जणांना माहिती आहे ?

शब्दप्रसवक्षमतेत संस्कृतचा हात धरील अशी दुसरी भाषा आजही जगात आढळणार नाही, यावर त्यांचा प्रगाढ विश्वास होता. संस्कृतनिष्ठ हिंदीचा राष्ट्रभाषा म्हणून अंगीकार करण्यात कोणत्याही प्रांतिक भाषेचा अवमान वा अधिक उणेपणा अभिप्रेत नाही, असेही त्यांचे सांगणे असे.

★★★


ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान

साहित्य प्रतिष्ठान



# सावरकरांची साहित्यसृष्टी

सावरकरांची 'साहित्यिक' जडणघडण त्यांच्या बालवयातच झाली, असे म्हणावे लागेल. त्यांचे वाचन व पाठांतर खूप होते. त्यांचे अक्षर सुंदर होते. वडिलांनाही साहित्याची गोडी होती. गोष्टी सांगण्याबरोबरच ते विनायकला मोठ्या प्रेमाने नवनवीन पुस्तके आणून देत असत. पुस्तक मिळाले की तो तहानभूक विसरत असे. पुस्तकातील उतारेच्या उतारे तो पाठ करीत असे. निरनिराळे श्लोक, मोरोपंताच्या आर्या, पोवाडे, कविता, ऋचा, स्तोत्रे यांचेही त्याचे भरपूर पाठांतर होते. विद्यार्थीदशेत व कॉलेजमध्ये गेल्यावर इंग्रजी भाषा आत्मसात करून त्याचा त्यांनी अभ्यास केला. इतर भाषाही ते शिकले. त्या भाषांमधील अनेक पुस्तके त्यांनी वाचली. वाचन, मनन व चिंतन या सर्वांचा लेखक व साहित्यिकाला आवश्यक असलेले तरल मन निर्माण होण्यासाठी खूप उपयोग झाला.


साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

जन्मजात विलक्षण अशी प्रतिभा त्यांच्याकडे होतीच. त्याच्या जोडीला वाणी आणि लेखणीवर मिळवलेले प्रभुत्व कामी आले. साहित्य प्रसवायला लेखकाला शांत मन आणि निकोप वातावरण लागते, असे सांगितले जाते. पण सावरकरांच्या धकाधकीच्या जीवनाकडे, त्यांनी सोसलेल्या कष्टांकडे व त्यांच्या बहुआयामी कर्तृत्वाकडे पाहिले तर त्यांच्या हातून विविध प्रकारचे, उच्च दर्जाचे प्रचंड साहित्य निर्माण झाले तरी कसे, या विचारानेच कुणाचेही मन विस्मयचकित होईल. कथा, कादंबरी, चरित्र, स्फुटलेखन, निबंध, वैचारिक लेखन, आत्मचरित्र, इतिहास, नाटक, काव्य, बातमीपत्रे, स्वतंत्रतेचे स्तोत्र असे साहित्याचे कितीतरी प्रकार त्यांनी हाताळले. '१८५७चे स्वातंत्र्यसमर'', 'मॅझिनीचे चरित्र', स्वतंत्रतेचे स्तोत्र 'सागरा प्राण तळमळला' हे काव्य, 'की घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने', 'अनादि मी अनंत मी अवध्य मी भला', 'अनेक फुले फुलती! फुलोनिया सुकोन जाती!' अशासारख्या काव्यपंक्ती अशा त्यांच्या कितीतरी साहित्यसंपदा वाङ्मयीन क्षेत्रात अजरामर झाल्या आहेत.

अलौकिक प्रतिभा, प्रखर राष्ट्रीय विचार आणि जीवनाच्या महान तत्त्वज्ञानाचे त्यातून दर्शन होते. एखादी कादंबरी, एखादे काव्य आणि एखादा लेख प्रसिद्ध झाला तरी अर्ध्या हळकुंडाने पिवळे होण्याचा सध्याचा जमाना आहे. सावरकरांचे विविधांगी साहित्य तर इतके अभिजात व समृद्ध आहे, की त्याची तुलनाही कुणाशी होऊ शकत नाही. वीर सावरकरांनी सुमारे सहा हजारहून अधिक पाने मराठी भाषेत, तर पंधराशेहून जास्त पाने इंग्रजी भाषेत लिहून साहित्याची केवळ अमोल सेवाच केली असे नसून, त्यावर त्यांनी आपला अमीट असा ठसा उमटवलेला आहे.

१९३८ मध्ये मुंबई येथे भरलेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होण्याचा मान सावरकरांना मिळाला. अध्यक्षीय भाषणातून त्यांनी दिलेला दिव्य संदेश देशभर गाजला. 'पुढील दहा वर्षांत सुनिते रचणारा एकही कवी किंवा साहित्यिक निर्माण न झाला तरी चालेल. पण रस्त्यावर बंदुका घेतलेल्या दहा-दहा सहस्त्र तरुणांचा चमू टपटप पावले टाकीत शहराशहरांतील रस्त्यांवरून संचलन करताना दिसला पाहिजे.' द्वितीय महायुद्धाचे रणशिंग त्या वेळी वाजत होते. अशा वेळी सावरकरांनी गर्जना केली की, 'भारताला स्वतंत्र होण्यासाठी हीच उत्तम संधी आहे. म्हणून लेखण्या मोडा आणि बंदुका हातात घ्या.'

★★★


ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान
साहित्य प्रतिष्ठान



**आसिंधु सिंधु पर्यन्ता यस्य भारतभूमिका ।**
**पितृभू: पुण्यभूश्चैव स वै हिंदु रितिस्मृत: ।।**

अर्थ : **“ज्याचे पितर या सिंधुनदीपासून त्या भारत सिंधुपर्यंत पसरलेल्या भरतखंडात, हिंदुस्थानात, निवसत आले, म्हणून ती ज्याची पितृभूमि आहे आणि ज्याचे धर्म संस्थापक त्याच भूमीत नि त्याच पितरांचे उदरी उत्पन्न होऊन आपआपले धर्म स्थापिते झाले आणि म्हणून ती ज्यांची पुण्यभू आहे, तो हिंदु ”**

# सावरकरप्रणीत ‘हिंदुराष्ट्र’ संकल्पना

१० मे १९३७ला स्वातंत्र्यवीर सावरकरांची रत्नागिरी स्थानबद्धतेतून विनाअट संपूर्ण मुक्तता झाली. त्यांच्यावरील सर्व बंधने दूर झाल्यामुळे राजनिती करण्यास ते मोकळे झाले होते. ३० डिसेंबर १९३७ ला कर्णावती (अहमदाबाद) येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय हिंदू महासभेच्या अध्यक्षपदी त्यांची प्रथम निवड झाली.

१९३७ ते १९४३ अशी सलग सहा वर्षे त्यांनी अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. भारतभर दौरे करून त्यांनी पक्षाला बळ प्राप्त करून देण्याचा आटोकाट प्रयत्न केला.


साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

अहमदाबादच्या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणात सावरकरांनी 'हिंदुराष्ट्र' या कल्पनेचा प्रथम उद्घोष केला. तर १९४० मध्ये सावरकरांनी एक पत्रक काढून काँग्रेस पाकिस्तान देण्याची शक्यता असल्याची प्रथमच चेतावणी दिली. केवळ राजकीय पक्षाच्या व्यासपीठावरूनच नव्हे, तर सावरकरांनी १९३७ ते १९६६ म्हणजे आपल्या आयुष्याच्या अंतिम पर्वात हिंदुहिताचा प्राधान्याने विचार करून सर्व आयुष्य हिंदुराष्ट्राच्या स्थापनेसाठीच व्यतीत केले. या देशाच्या राष्ट्रीयत्वाबद्दल सावरकरांनी अंदमानमध्ये कारावासात असतानाच खूप चिंतन केले होते. त्यांच्या चिंतनातून व विचारमंथनातून त्यांचा 'हिंदुत्व' हा ग्रंथ आकारास आला.

'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' असल्याची सिंहगर्जना त्यांनी केली. देशाची सारी राजनीती हिंदूंचे हित लक्षात घेऊनच केली पाहिजे. तसेच हिंदू हा आक्रमक व लढवय्या बनला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. मुसलमानांच्या संदर्भात त्यांचे राजकीय धोरण अगदी स्पष्ट होते. 'याल तर तुमच्यासह, न याल तर तुम्हांविना,' आणि 'विरोध कराल तर तुम्हास विरोधून हिंदुराष्ट्र आपले भवितव्य जमेल तसे घडवील,' हे त्यांचे इशारेवजा उद्गार प्रसिद्ध आहेत.

'हिंदू हे स्वयंमेव राष्ट्र आहे. प्रादेशिक एकतेबरोबरच धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक अशा साऱ्या बंधांनी आम्ही एक आहोत आणि हे हिंदू राजकीयदृष्ट्या जागृत आणि संघटित झाले तर राष्ट्र समर्थ व्हायला वेळ लागणार नाही,' हे त्यांनी वेळोवेळी सांगितले. सावरकरांनी आपल्या वयाच्या ८०व्या वर्षी 'भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने' हा ग्रंथ लिहिला. त्यातून त्यांचा हिंदू समाजाबद्दलचा सखोल अभ्यास दिसून येतो. 'सद्गुणविकृती' हा हिंदू समाजाचा मुख्य अवगुण असल्याचा निष्कर्ष त्यांनी अभ्यासाअंती काढला असून त्यावरील उपाययोजनाही त्यांनी सांगितली आहे. 'कोणताही गुण हा जेव्हा मनुष्यजातीच्या हितास उपकारक ठरतो, तेव्हा तितक्या मर्यादेपर्यंत तो सद्गुण समजला पाहिजे आणि जेथून तो गुण मनुष्यजातीच्या घातास किंवा अध:पातास कारणीभूत होतो तेथून त्याचे दुर्गुणात रूपांतर होते. म्हणून तो त्याज्य ठरतो.' असे त्यांनी म्हटले आहे. अशा सद्गुणविकृतीमुळेच हिंदूंचा राष्ट्रीय घात झाला, अशी मीमांसा त्यांनी केली असून त्यापासून दूर राहण्याचा समादेश त्यांनी हिंदूंना दिला आहे. शत्रूवर विजय मिळवल्यानंतर त्यांचा संपूर्ण नि:पात करण्याऐवजी त्यांना जीवदान देणे घातक ठरते.

हिंदूंनी, आक्रमक, अत्याचारी, अमानुष मुस्लिमांवर जशास तसे प्रत्याक्रमण केले नाही. त्यामुळे शत्रूने हिंदू समाजावर पुन:पुन्हा आक्रमण केले!

★★★


ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान
साहित्य प्रतिष्ठान



# निदिध्यास 'अखंड भारता'चा

हिंदुस्थानला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यानंतरचा १९ वर्षांचा कालखंड हा स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या आयुष्यात अनेक चांगल्या-वाईट घटनांनी भरलेला आहे. महात्मा गांधींच्या हत्येमध्ये पक्षपातीपणाने गोवून त्यांना झालेली अटक ही त्यांच्या आयुष्यातील अत्यंत दुःखद घटना म्हणावी लागेल. स्वातंत्र्यापूर्वी इंग्रजांच्या राज्यात या महापुरुषाला वर्षानुवर्षे तुरुंगात खितपत पडावे लागले होते. पण स्वराज्यातही आपल्या राज्यकर्त्यांनी या देशभक्तावर तुरुंगाची हवा चाखण्याची पाळी आणली. नियतीला ही गोष्ट मान्य नव्हती, याचा प्रत्यय या घटनेत प्रकर्षाने आला. गांधीहत्येच्या खटल्यातून त्यांची निर्दोष सुटका होऊन ते निष्कलंक असल्याचे सिद्ध झाले.

वडीलबंधू गणेशराव उपाख्य बाबाराव सावरकर यांचे १९४५ साली, धाकटे बंधू नारायणराव सावरकर यांचे १९४९ साली, पत्नी यमुनाबाई यांचे १९६३ साली झालेले निधन त्यांना अपार दुःख देऊन गेले. स्वातंत्र्ययज्ञ चेतवण्यासाठी या तिघांनी दिलेल्या योगदानाची स्मृती जागवीत सावरकरांनी या तिघांचे मृत्यू पचवले. १९ वर्षांच्या काळातील हे दुःखद प्रसंग


साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

घडले असले तरी याच काळात सावरकर या नावाचा महिमा समाजाला खऱ्या अर्थाने उमजू लागला होता, असे म्हणावे लागेल. मुंबई महापालिकेकडून अमृत महोत्सवानिमित्त झालेला सत्कार, १८५७चा शताब्दी महोत्सव, पुणे विद्यापीठाने दिलेली डी.लिट ही सन्मान्य पदवी, अभिनव भारत संस्थेचा सांगता समारंभ आणि १९६०-६१मध्ये साजरा झालेला मृत्युंजय दिन, मुंबईचे राज्यपाल श्रीप्रकाश यांनी सावरकरांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची घेतलेली भेट, १९६४ मध्ये भारत सरकारकडून देशभक्त म्हणून मासिक ३०० रुपये मानधन देऊन केलेला सन्मान या त्यांच्या आयुष्यातील आनंददायक घटना असून समाजपुरुषाला त्यांची खरीखुरी ओळख झाल्याचे त्या घटनांवरून स्पष्ट होते.

स्वातंत्र्ययुद्ध अनेक जण लढले. पण स्वातंत्र्यसमर जगणारा एकमेव माणूस म्हणजे सावरकर. देशाच्या फाळणीला सावरकरांनी प्राणपणाने विरोध केला होता. पण अखेर काँग्रेसच्या कचखाऊ धोरणामुळे फाळणी होऊन देशाचे दोन तुकडे झाले. पाकिस्तान झाल्याचे त्यांना अतोनात दुःख झाले. त्याबद्दल त्यांनी संतापही व्यक्त केला. पण भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन त्यांनी आपल्या घरावर मादाम कामांनी सावरकरांच्या प्रेरणेने ॲमस्टरडॅम परिषदेत फडकावलेला भगवा आणि राष्ट्रध्वज उभारून दुःखमिश्रित आनंदाने साजरा केला. जेवढा भूभाग स्वतंत्र झाला त्याचे मनापासून स्वागत करून 'अखंड भारत' निर्माण करण्याची विजिगीषा बाळगा, हा संदेश त्यांनी त्यातून समाजाला दिला. स्वातंत्र्यसमर जगणारा वीरच हे करू शकतो.

११ मे १९५२ला पुण्याला झालेल्या 'अभिनव भारत'च्या सांगता समारंभात त्यांनी 'सिंधुसूक्त' गाऊन अखंड भारताची विजिगीषा समर्थ शब्दात चेतवली आहे. देशाच्या फाळणीत सिंधू नदी फाळणीत गेली. स्नानाच्या वेळी म्हटल्या जाणाऱ्या 'गंगे च यमुने-चैव गोदावरी सरस्वती नर्मदे सिंधू कावेरी जलेऽस्मिन संन्निधिं कुरु।।' या मंत्रामधील सिंधू भारतात नाही. याचे त्यांना कमालीचे वैषम्य वाटत होते. म्हणून सावरकरांनी सिंधूला उद्देशून गायलेले अखंड भारताचे सूक्त प्रत्येक भारतीयाने कानात साठवावे असे आहे.

'छे! छे! सारे जग जरी आमचा द्वेष करू लागले किंवा साऱ्या जगाचा जरी आम्हास द्वेष करावा लागला तरी सिंधूचा संबंध आम्ही सोडणार नाही. तोडणार नाही. सिंधूस आम्ही विसरू ? सिंधूवाचून हिंदू! अर्थावाचून शब्द! प्राणावाचून कुडी! अशक्य अशक्य! जोवर एक तरी हिंदू जिवंत आहे, तोवर तो सिंधूस विसरणे शक्य नाही! तुला कोणीही एक वेळ विसरले तरी हे स्त्रोतस्विनी सिंधू हा आमचा एकटा महाराष्ट्र उठून तुला पुन्हा विमुक्त केल्यावाचून राहणार नाही!'

★★★



ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान

साहित्य प्रतिष्ठान



# इथे ओशाळला मृत्यू

स्वातंत्र्यवीर सावरकरांना सन १९१० मध्ये ५० वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा झाली. ही शिक्षा ऐकूनच एखाद्याला कापरे भरून तो गलितगात्र झाला असता. पण सावरकरांनी 'ब्रिटिश सरकार तरी इथे ५० वर्षे टिकणार आहे का?' असा बाणेदार सवाल करून गोऱ्यांना त्यांची जागा दाखवून दिली होती. मृत्यूच्या जबड्यात शिरून, पण त्यावर मात करून ते बाहेर आले होते. आपल्या उभ्या आयुष्यात मातृभूमीसाठी सर्वस्व अर्पण करताना सावरकरांनी 'अनादि मी अनंत मी अवध्य मी भला। मारिल रिपू जगती असा कवण जन्मला।।' अशा काव्यमय शब्दात मृत्यूला चकवले होते. नव्हे त्याचा उपहास केला होता.

काळ्या पाण्याची ५० वर्षांची शिक्षा अखेरपर्यंत भोगावी लागली असती, तर २४ डिसेंबर १९६० पर्यंत त्यांना अंदमानच्या तुरुंगातच अडकून पडावे लागले असते. पण काळ्या पाण्याच्या शिक्षेवरही त्यांनी मात केली. मृत्यूशी झुंज देऊन त्यांनी हा विजय मिळवला होता. त्यांच्या अनुयायांनी त्या वेळी 'मृत्युंजय दिन' साजरा करून त्यांचा सन्मानही केला. पण मृत्यू कुणाला चुकलाय? जन्माला आलेल्या प्रत्येकालाच इहलोकीची यात्रा संपवावी लागते.



साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

सावरकरांनाही त्याची 'चाहूल' लागली होती. आजारपण, वार्धक्य, सहधर्मचारिणीचा मृत्यू आणि करण्यासाठी आता काहीही उरलेले नाही' असे कर्तव्यपूर्तीचे समाधान यामुळे मृत्यूच्या स्वागतासाठी ते उत्सुक झाले होते. पण अशा वेळीही त्यांनी महापुरुषांचा मार्ग अनुसरून मृत्यूला जिंकले असे म्हणावे लागेल.

आत्मसमर्पण करण्याचा निश्चय करून त्यांनी आपला देह मृत्यूच्या स्वाधीन करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी अन्न घेण्याचे सोडले. दूध, औषधपाणी, चहा, कॉफी, फळे व त्यांचा रस यालाही त्यांनी फाटा दिला. शेवटच्या २० दिवसांत तर पाण्याशिवाय त्यांनी काहीही घेतले नाही. अखेर २६ फेब्रुवारी १९६६ला दुपारी ११ वा. ३० मिनिटांनी त्यांनी अगदी शांतपणे व समाधानाने प्रवासाला निघावे, अशा थाटात परलोकी गमन केले.

'धन्योहम कृतार्थोहं।' असा लाखो लोकांकडून मानाचा मुजरा घेत त्यांनी या जगातून प्रयाण केले. भारतीय स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या जीवनाचा होम करून त्याद्वारे लाखोंना प्रेरणा देणाऱ्या क्रांतिकारकाच्या अग्रणीने अखेरचा श्वास घेतला. कुटुंबाचे, कुळाचे, घराण्याचे, समाजाचे, देशाचे, मातृभूमीचे आणि धर्माचे अशी यच्चयावत सगळी ऋणे फेडून कर्तव्यमुक्त झालेल्या सावरकरांनी अत्यंत समाधानाने या जगाचा कायमचा निरोप घेतला. 'मी धन्य आहे; मी धन्य आहे, करायचे असे काही एक कार्य उरले नाही,' अशा कृतार्थतेच्या भावनेने ते काळाच्या पडद्याआड गेले.

जिवंतपणी काळावर निर्णायक विजय मिळवून अपराजित राहिलेले सावरकर अखेरच्या क्षणी मृत्यूवरही विजय मिळवून अनंतकाळाचे विजेते ठरले. संपूर्ण जगाच्या इतिहासात आजवर असं 'अजिंक्य' व्यक्तिमत्त्व झालेले नाही. 'जन्म' या शब्दात 'ज' आणि 'म' ही दोन पूर्ण अक्षरे आहेत. जगणे आणि मरणे हा त्या अक्षरांचा खरा अर्थ आहे. जन्माला आलेल्या प्रत्येकालाच जगण्याबरोबर मरणही अभिप्रेत आहे. पण दोन्हीवर आपल्या कर्तृत्वाने विजय मिळवून अमरत्वाचे वरदान लाभलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हेच 'एकमेवाद्वितीय' व्यक्तिमत्त्व म्हणावे लागेल. कारण, त्यांचे अनेक विचारही, कालांतराने शासनाला स्वीकारावे लागले.

★★★


ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान



# परंतु या सम हाच!

गेल्या सव्वाशे वर्षांत जगामध्ये अनेक महापुरुष होऊन गेले. पण स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांइतके बहुआयामी आयुष्य जगणारा अन्य महापुरुष या अवनीतलावर होऊन गेला असेल, असे वाटत नाही. त्यांचे जीवन विविध प्रकारच्या घटना आणि प्रसंगांनी ओतप्रोत भरलेले आहे. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक, वैचारिक, भाषिक आणि ऐतिहासिक अशा सर्व प्रकारच्या अंगांचा त्यांच्या जीवनाला स्पर्श झाला होता. या सर्व क्षेत्रांत काम करताना त्यातील अत्युच्च शिखरे त्यांनी गाठली. कारण, विचाराला ते पक्के होते. आपल्या जीवितकार्याबद्दल त्यांनी आपल्याच एका कवितेत अत्यंत समर्थपणे लिहिले आहे.


साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

'की घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने
लब्ध प्रकाश इतिहास निसर्गमाने
जे दिव्य दाहक म्हणोनि असावयाचे
बुद्ध्याचि वाण धरिले करि हे सतीचे'

देशसेवेचे हे वाण फेडताना त्यांना कितीतरी गोष्टींना तोंड द्यावे लागले, याला गणतीच नाही. त्यांच्या जीवनात शृंखलांचे भोग आहेत, तसेच पुष्पहारांचे योग आहेत. बॉम्ब-पिस्तुले आहेत तशीच कोमल काव्ये आहेत. वक्तृत्वाचा प्रचंड धबधबा आहे, तसेच मनस्वी एकाकीपणही आहे. त्यांच्या हातातील अस्त्रे जितकी भेदक तितकीच त्यांची बुद्धिमत्ताही भविष्यदर्शी होती. त्यांचे जीवन म्हणजे त्याग, अपार कष्ट व बलिदानाचा खजिनाच आहे. इतके चढ-उतार, इतके रोमहर्षक प्रसंग, इतकी धडपड आणि इतकी चिकाटी अनुभवलेला दुसरा महापुरुष झाला नाही. दुर्मीळ गुणांचे इतके असामान्य मिश्रण एकाच व्यक्तीच्या ठायी एकवटलेला अन्य कीर्तिवान नाही. त्यांच्या कोणत्याच कार्याला तोड नाही. त्यांच्याइतकी विचारांची व दृष्टीची उत्तुंग झेप असणारा द्रष्टा दुसरा नाही. एकाच वाक्यात त्यांच्याबद्दल बोलायचे झाल्यास 'झाले बहु, होतीलही बहु पण यासम हाच!' या समर्थ शब्दातच त्यांचे वर्णन करावे लागेल.

★★★


ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान
साहित्य प्रतिष्ठान



# समस्त सावरकर देशकारणी विलीन

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना 'स्वातंत्र्यसूर्य' ही उपमाच अधिक शोभून दिसेल. सूर्य जितका तेजस्वी व दाहक तसाच तो 'जीवनदायी'देखील आहे. त्यादृष्टीने सावरकर प्रेरणास्त्रोत ठरले आहेत. सावरकर नावाचे यच्चयावत सारे कुटुंबच त्यांच्या प्रेरक विचारांनी देशसेवेच्या चरणी समर्पित झाल्याचे दिसून येईल.

वडील दामोदरपंत व आई राधाबाई यांच्या संस्कारांमुळे स्वातंत्र्यवीरांची जडणघडण झाली. पण त्यानंतर त्यांनी देशसेवेचे बुध्याचि वाण धरून कर्तृत्वाच्या भरारीवर स्वातंत्र्यसूर्याकडे झेप घेतली.

ज्येष्ठ बंधू गणेश दामोदर तथा बाबाराव सावरकर, त्यांच्या पत्नी यशोदाबाई, धाकटे बंधू डॉ. नारायण दामोदर तथा बाळ सावरकर, त्यांच्या पत्नी शांताबाई, सावरकरांच्या पत्नी यमुनाबाई तथा माई सावरकर हे सारे सावरकर नावाचे यच्चयावत कुटुंबच त्यांच्या प्रभावी विचाराने प्रिय मातृभूमीच्या चरणी समर्पित झाल्याची नोंद इतिहासात आहे. सर्व कुटुंबच एका ध्येयाने प्रेरित होऊन देशसेवेसाठी समर्पित झाल्याचे दुसरे उदाहरण नाही.

★★★



साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

# स्वातंत्र्यवीर सावरकरांचा जीवनपट

| | |
|---|---|
| १८८३ मे २८ | भगूर गाव, जि. नाशिक येथे जन्म |
| १८९२ | जन्मदात्या आईचे निधन |
| १८९८ मे | अष्टभूजा देवीपुढे सशस्त्र क्रांतीची शपथ |
| १८९९ सप्टें. ५ | जन्मदात्या वडिलांचे निधन |
| १९०० जाने. १ | मित्रमेळ्याची स्थापना |
| १९०१ मार्च | विवाह |
| १९०१ डिसें. १९ | मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण |
| १९०१ जाने. २४ | पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश |
| १९०३ | 'जयोस्तुते' गीतरचना केली |
| १९०४ मे | 'अभिनव भारत' नावाच्या आंतरराष्ट्रीय क्रांतीसंस्थेची स्थापना |
| १९०४ डिसें. | पहिली एल.एल.बी. परीक्षा उत्तीर्ण |
| १९०५ दसरा | विदेशी कपड्यांची होळी |
| १९०५ डिसें. २१ | बी.ए. परीक्षा उत्तीर्ण |
| १९०६ जून ९ | लंडनला प्रयाण |
| १९०७ मे १० | १८५७च्या स्वातंत्र्ययुद्धाचा लंडनमध्ये सुवर्ण महोत्सव |
| १९०७ जून | मॅझिनीचे चरित्र प्रसिद्ध केले |
| १९०८ मे २ | लंडनमध्ये प्रथमच 'शिवजयंती' उत्सव साजरा |
| १९०८ | हॉलंडमध्ये 'सत्तावन्नचे स्वातंत्र्यसमर' इंग्रजीतून गुप्तपणे छापले |
| १९०९ मे | बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण, पण पदवीस सरकारचा नकार |
| १९०९ जून ८ | वडीलबंधू बाबाराव यांना जन्मठेप; काळ्या पाण्याची शिक्षा |
| १९०९ जुलै १ | मदनलाल धिंग्राने कर्झन वायलीचा खून केला |
| १९०९ ऑक्टो. २४ | लंडनमध्ये दसऱ्याचा उत्सव. अध्यक्ष होते बॅरिस्टर गांधी |
| १९१० मार्च १३ | पॅरिसहून लंडनला येताना त्वरित अटक |
| १९१० जुलै ८ | मार्सेलिस बंदरात समुद्रात उडी |
| १९१० डिसें. २४ | जन्मठेप - काळ्या पाण्याची शिक्षा |



ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान
साहित्य प्रतिष्ठान

| | |
|---|---|
| १९११ जुलै ४ | अंदमान येथील तुरुंगवास सुरू |
| १९१९ एप्रिल | बाबारावांच्या पत्नी सौ. येसू वहिनींचे निधन |
| १९२० नोव्हें. ३० | पत्नी, धाकटे बंधू, भावजय अंदमान तुरुंगात जाऊन भेटले |
| १९२१ मे २ | बाबाराव व तात्याराव या दोघांची अंदमानातून हिंदुस्थानात पाठवणी |
| १९२१-१९२२ | अलिपूर (बंगाल) व रत्नागिरी येथील बंदीवास |
| १९२३ | मुंबईचे राज्यपाल लॉर्ड जॉर्ज यांची सावरकरांशी सुटकेबाबत चर्चा |
| १९२४ जाने. ६ | राजकारणात भाग घ्यायचा नाही व रत्नागिरी जिल्ह्यातच राहायचे या दोन अटींवर येरवडा तुरुंगातून सुटका |
| १९२५ जाने. ७ | कन्या 'प्रभात' हिचा जन्म |
| १९२६ जाने. १० | हुतात्मा स्वामी श्रद्धानंदांच्या स्मरणार्थ 'श्रद्धानंद' साप्ताहिक मुंबई येथे सुरू केले. |
| १९२७ मार्च १ | रत्नागिरी येथे गांधीजी-सावरकर भेट व चर्चा |
| १९२८ मार्च १७ | पुत्र 'विश्वास' याचा जन्म |
| १९३० नोव्हें. १६ | स्पृश्यास्पृश्यांचे पहिले प्रकट सहभोजन रत्नागिरीमध्ये झाले |
| १९३१ फेब्रु. २२ | पतितपावन मंदिरात श्री लक्ष्मीनारायण मूर्तीची प्राणप्रतिष्ठा |
| १९३१ फेब्रु. २५ | मुंबई इलाखा अस्पृश्यता निवारक परिषद अधिवेशन ६वे - अध्यक्ष |
| १९३१ एप्रिल २६ | सोमवंशी महार परिषद अध्यक्ष, पतितपावन मंदिरात सभा |
| १९३१ सप्टें. २ | नेपाळ राजपुत्र हेम समशेर जंग बहादुर राणा यांनी भेट दिली |
| १९३१ सप्टें. १७ | श्री गणेश उत्सवात भंगीबुवांचे कीर्तन, महारांचा गीतापाठ आणि ७५ स्पृश्यास्पृश्य महिलांचे पहिले सहभोजन |
| १९३७ मे १० | रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून विनाअट संपूर्ण मुक्तता |
| १९३७ डिसें. ३० | हिंदू महासभेच्या १९व्या अखिल भारतीय अधिवेशनाचे अध्यक्ष कर्णावती |
| १९३८ एप्रिल १५ | महाराष्ट्र साहित्य संमेलन २२वे अधिवेशन मुंबई, अध्यक्ष |
| १९३९ फेब्रु. १ | निजामविरोधी 'भागानगरचा लढा' प्रारंभ |
| १९४० जून २२ | सुभाषचंद्र बोस सावरकर सदनात अवचित येऊन भेटले. चर्चा |
| १९४३ मे २८ | ६१व्या वाढदिवसानिमित्त पुण्यात अ.भा. सत्कार - निधी समर्पण |
| १९४३ ऑगस्ट १४ | नागपूर विद्यापीठाने डी.लिट. ही सन्मान्य पदवी दिली |
| १९४३ नोव्हें. ५ | सांगली येथे अखिल महाराष्ट्र नाट्यशताब्दी महोत्सवाचे अध्यक्ष |



साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

| | |
|---|---|
| १९४५ मार्च १६ | वडीलबंधू श्री. गणेशपंत तथा बाबाराव यांचे सांगली येथे निधन |
| १९४५ एप्रिल १९ | अ.भा. हिंदु महासभा अधिवेशन (बडोदे) अध्यक्ष |
| १९४५ मे ८ | कन्या 'प्रभात'चा पुणे येथे विवाह |
| १९४६ एप्रिल | संपूर्ण सावरकर वाङ्मयावरील बंदी मुंबई सरकारने उठविली |
| १९४७ ऑगस्ट १५ | दु:खमिश्रीत आनंद. घरावर भगवा ध्वज, राष्ट्रध्वज उभारला |
| १९४८ फेब्रु. ५ | गांधी वधानंतर सुरक्षेच्या निर्बंधासाठी अटक |
| १९४९ फेब्रु. १० | गांधीवध अभियोगातून निष्कलंक सुटका |
| १९४९ ऑक्टो. १९ | धाकटे बंधु डॉ. नारायणराव यांचे निधन |
| १९४९ डिसेंबर | अ.भा.हिं.म. सभा कलकत्ता अधिवेशनाचे उद्घाटक |
| १९५० एप्रिल ४ | पाक पंतप्रधान लियाकत अलींची दिल्ली भेट म्हणून<br>अटक आणि बेळगाव कारागृहात रवानगी |
| १९५२ मे १० व १२ | पुणे येथे 'अभिनव भारत' संस्थेचा सांगता समारंभ साजरा |
| १९५६ जुलै २३ | लो. टिळक जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त पुणे येथे भाषण |
| १९५६ नोव्हें. १० | अ.भा.हिं.म. सभा, जोधपूर अधिवेशनाचे उद्घाटक |
| १९५७ मे १० | दिल्ली येथे १८५७च्या स्वातंत्र्ययुद्ध शताब्दी महोत्सवात भाषण |
| १९५८ मे २८ | ७५ वा वाढदिवस, मुंबई महानगरपालिकेकडून जाहीर सत्कार |
| १९५९ ऑक्टो. ८ | पुणे विद्यापीठाने 'डी-लिट्' सन्मान्य पदवी घरी येऊन दिली |
| १९६० डिसें. २४ | मृत्युंजय दिन थाटात साजरा |
| १९६१ जाने. १४ | मृत्युंजय दिनानिमित्त पुणे येथे विराट गर्दीत शेवटचे जाहीर भाषण |
| १९६२ एप्रिल १५ | मुंबईचे राज्यपाल माननीय श्री. प्रकाश घरी येऊन भेटले |
| १९६३ मे २९ | मांडीचे हाड मोडल्यामुळे रुग्णालयात दाखल |
| १९६३ नोव्हें. ८ | पत्नी सौ. यमुनाबाई यांचे निधन |
| १९६४ ऑक्टो. १ | मृत्युपत्र केले |
| १९६४ ऑक्टो. | भारत सरकारकडून मासिक रु ३००/- मानधन देऊन सन्मान |
| १९६५ सप्टें. | गंभीर आजार. प्रकृती चिंताजनक |
| १९६६ फेब्रु. १ | अन्नपाणी, औषधे वर्ज्य करुन प्रायोप्रवेशनास प्रारंभ |
| १९६६ फेब्रु. २६ | शनिवारी सकाळी ११.१५ वा. देह विसर्जन. वय ८३ वर्षे |
| १९६६ फेब्रु. २६ | महायात्रा प्रारंभ. रा.स्व. संघाची सैनिकी मानवंदना.<br>मुंबईच्या चंदनवाडी विद्युतदाहिनीत अग्नीसंस्कार. |



ई वितरण : ई साहित्य प्रतिष्ठान
साहित्य प्रतिष्ठान

# ने मजसी ने परत मातृभूमीला । सागरा, प्राण तळमळला

भूमातेच्या चरणतला तुज धूतां । मी नित्य पाहिला होता
मज वदलासी अन्य देशिं चल जाऊ । सृष्टिची विविधता पाहू
तव जननी-हृद् विरहशंकितहि झालें । परि तुवां वचन तिज दिधलें
मार्गज्ञ स्वयें मीच पृष्टि वाहीन । त्वरित या परत आणीन
विश्वसलो या तव वचनी । मी
जगदनुभव-योगे बनुनी । मी
तव अधिक शक्त उद्धरणी । मी
येइन त्वरें कथुन सोडिलें तिजला । सागरा, प्राण तळमळला

शुक पंजरिं वा हरिण शिरावा पाशीं । ही फसगत झाली तैशी
भूविरह कसा सतत साहु यापुढती । दशदिशा तमोमय होती
गुण-सुमनें मी वेचियली ह्या भावें । कीं तिने सुगंधा घ्यावें
जरि उद्धरणी व्यय न तिच्या हो साचा । हा व्यर्थ भार विद्येचा
ती आम्रवृक्षवत्सलता । रे
नवकुसुमयुता त्या सुलता । रे
तो बाल गुलाबही आता । रे
फुलबाग मला हाय पारखा झाला । सागरा, प्राण तळमळला

नभि नक्षत्रें बहुत एक परि प्यारा । मज भरतभूमिचा तारा
प्रासाद इथें भव्य परी मज भारी । आईची झोपडी प्यारी
तिजवीण नको राज्य, मज प्रिय साचा । वनवास तिच्या जरी वनिंच्या
भुलविणें व्यर्थ हें आता । रे
बहु जिवलग गमतें चित्ता । रे
तुज सरित्पते । जी सरिता । रे
तद्विरहाची शपथ घालितो तुजला । सागरा, प्राण तळमळला

या फेन-मिषें हससि निर्दया कैसा । का वचन भंगिसी ऐसा
त्वत्स्वामित्वा सांप्रत जी मिरवीते । भिउनि का आंग्लभूमीतें
मन्मातेला अबल म्हणुनि फसवीसी । मज विवासनातें देशी
तरि आंग्लभूमी-भयभीता । रे
अबला न माझिही माता । रे
कथिल हे अगस्तिस आता । रे
जो आचमनी एक पळीं तुज प्याला । सागरा, प्राण तळमळला



साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com


१०० रुपयांत
३०० ई-पुस्तके
www.esahity.com
esahity@gmail.com
ई साहित्य प्रतिष्ठान®